# रंग तरंग

डॉ. सतीश श्रीवास्तव

# रंगतरंग

डॉ. सतीश श्रीवास्तव

ई–साहित्य प्रतिष्ठान

**रंग तरंग**

**डॉ. सतीश श्रीवास्तव**

संपर्क : ९४२२२४५८५९

Rang Tarang (E-book)

Dr. Satish Shrivastrav

ISBN : 978-93-5235-392-7

© **नीला श्रीवास्तव**

**प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान**

प्रथम आवृत्ती

**३ जुलै २०१५**

मुखपृष्ठ

**मुग्धा दंडवते**

अंतर्गत सजावट

**दीपक दंडवते**

**अभिजित**

**व**

**ऋचा**

यास...

वो सूफी का कौल हो या पण्डित का ज्ञान
जितनी बीते आप पर उतना ही सच मान

**– निदा फाजली**

**पूर्व प्रसिद्धी :**

गांवकरी,

महाराष्ट्र टाइम्स

# अंतरंग


१. वैद्यराज नमोस्तुभ्यम
२. फेसबुकवरचा फसफसाट
३. पितर आणि इतर
४. गरज बरस प्यासी धरतीपर
५. रेडिओचे दिवस
६. चष्मेबद्दूर
७. आयुष्याचा फ्रूस
८. बघ आई आकाशात
९. मला वेड लागले प्रेमाचे
१०. पाठीमागे वळून बघतांना
११. वाव, मम्मी व यो
१२. आली दिवाळी
१३. लोकशाहीच्या नावानं चांगभलं
१४. डोळे हे फिल्मी गडे
१५. क्लिक क्लिक
१६. ढाई आखर प्रेमका
१७. सत्यं ब्रुयात प्रियं ब्रुयात
१८. फॅशनेबल दुनिया
१९. बडे हुए तो क्या हुवा
२०. जब तक साँस

२१.	आला क्षण गेला क्षण
२२.	अपने घर का बिस्तर
२३.	रंग राजकारणाचे
२४.	दुनिया रंगरंगिली
२५.	चरैवेति चरैवेति
२६.	घर घर की कहानी
२७.	कुठे गेलेत ते लोक
२८.	माया मरी न मन मरा
२९.	तोल मोल के बोल
३०.	चली चली रे पतंग
३१.	सारे जहाँसे अच्छा
३२.	देवाचिये द्वारी
३३.	निरोप गणरायाला
३४.	भारतीय वंशाचा डिंडिम
३५.	बैलगाडी ते बी.एम.डब्ल्यू.
३६.	तमसो मा ज्योतीर्गमय
३७.	चाँद जब चमके
३८.	नवीन वर्ष व छोटीसी आशा

◆◆

# वैद्यराज नमोस्तुभ्यम्...

दोन अस्थिरोग तज्ज्ञ सकाळी जॉगिंग करीत होते. त्यांच्यासमोर त्यांना एक व्यक्ती लंगडत जाताना दिसली. पहिला अस्थिरोग तज्ज्ञ म्हणाला, ‘या माणसाच्या गुडघ्याच्या जॉईंटमध्ये नक्कीच दोष आहे. दुसरा तज्ज्ञ म्हणाला, ‘त्याच्या चालण्यावरून मला असे वाटते की, त्याच्या माकड हाडात, हिप जॉईंटमध्ये प्रॉब्लेम असावा.’ कुणाचा अंदाज खरा निघतो हे बघावे म्हणून त्यांनी त्या व्यक्तीला विचारले, ‘का लंगडत आहात?’ ती व्यक्ती उत्तरली, ‘माझी चप्पल तुटलीय म्हणून.’

डॉक्टरकडे कधी जावे लागले नाही, अशी व्यक्ती दुर्मीळच. ‘शरीर आद्यं खलु धर्म साधनम्,’ असे म्हणतात. सर्व धर्माचे साधन किंबहुना जगण्याचा संबंधच शरीराशी आहे. जान है तो जहान है. हर्ष, अपहर्ष, सुख, दु:ख, आनंद, निराशा, आशा, विजय, पराजय, कर्तृत्व, अकर्मण्यता, विचार, आचार, अविचार, भोग, उपभोग हे सर्व सजीव शरीराशी निगडित आहे. आपले शरीर हाच निसर्गाचा अद्‍भुत चमत्कार; पण याबरोबरच चमत्कारिक रोगही आले आणि हे रोग दूर करणारा वैद्यराजही आला. परमेश्वर व डॉक्टर यांना कधी नाराज करू नये. परमेश्वर नाराज झाला तर डॉक्टरकडे जावे लागते; परंतु डॉक्टर नाराज झाले, तर थेट परमेश्वराकडेच जावे लागते.

डॉक्टर व पेशंट यांचे संबंध पूर्वी खूप जवळचे, हार्दिक व कौटुंबिक होते. विशेषत: छोट्या गावातून असे संबंध सहज जोपासले जात. गावाकडच्या डॉक्टरांना सगळ्या शाखांमधले थोडे थोडे ज्ञान असावे लागते. त्यांच्याकडे दाढ–दुखीचा पेशंट येतो, तसेच त्यांना मोडलेले हाडही बसवावे लागते. अडल्या–नडल्या वेळी बाळंतपणदेखील करावे लागते अन् छोट्या–मोठ्या शस्त्रक्रियाही कराव्या लागतात. आता प्रत्येक अवयवाचा व रोगाचा स्पेशालिस्ट असतो. गमतीने असेही म्हटले जाते की, नाकाच्या डाव्या नाकपुडीचा व उजव्या नाकपुडीचा स्वतंत्र स्पेशालिस्ट असतो.

पूर्वी डॉक्टर स्वत:च्या हातांचा, डोळ्यांचा (निरीक्षणाने) कानांचा (स्टेथस्कोपने) वापर करून पेशंट तपासत. पेशंटचे डोळे, जीभ, नाडी, पोट, नखे याची बारकाईने तपासणी करून त्याला अनुभवाची जोड देऊन निदान व उपचार करीत. विविध प्रकारचे स्कॅन व पॅथॉलॉजीमुळे डॉक्टरांच्या निदानाला आता अचूकता आलेली असली, तरी पेशंटच्या खिशालाही त्यामुळे गळती लागलेली आहे. ज्ञानविज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे वैद्यकीय क्षेत्रातही आमूलाग्र बदल झाले आहेत. संगणकाने या क्षेत्रातही क्रांती केली आहे. त्यामुळे डॉक्टर हा वैद्यक शास्त्रात पारंगत असण्याबरोबरच तो तंत्रज्ञ (टेक्नोक्रॅट) असणेही गरजेचे झाले आहे.

शिक्षण व वैद्यकीय व्यवसाय हे दोन्ही सेवेवर आधारित व म्हणूनच उदात्त (नोबल) व्यवसाय गणले जातात. या दोन्ही क्षेत्रात भांडवल गुंतवणूक आली व याही क्षेत्राचे हळूहळू व्यापारीकरण व्हायला लागले. विद्यार्थ्याने शिक्षकाविषयी व्यक्त केलेली कृतज्ञता आणि पेशंट रोगमुक्त झाल्यानंतर त्याच्या मनात दाटून आलेली कृतज्ञता याचे मोल पैशात करता येण्यासारखे नसते. गैरमार्गाने धनसंचय करणारे लोक जसे असतात तसेच सद्‌भावनेने पैसा मिळविणारे आणि स्वार्थ व परमार्थ यांचा मेळ घालणारे असंख्य लोक या क्षेत्रातही आहेत. आपल्या संस्कृत सुभाषितकारांना उत्तम विनोद बुध्दी होती. त्यामुळे ते म्हणतात, ‘वैद्यराज नमोस्तुभ्यम् यमराज सहोदर: यमस्तु हरति प्राणान वैद्य: प्राणानधनानिच’ म्हणजे यमराजाचा भाऊ (सहोदर) असणाऱ्या वैद्यराजास नमस्कार असो. यम केवळ प्राणच घेतो; परंतु वैद्यराज प्राण व धन दोन्ही घेतात. यातील विनोद सोडून दिला तरी यमाच्या

दरबारातून माणसाची सुटका करणाराही वैद्यराजच असतो हेदेखील तितकेच खरे आहे.

नव्याने क्लिनिक किंवा हॉस्पिटलचे उद्‌घाटन करणाऱ्या डॉक्टर मित्रांना शुभेच्छा देताना मोठीच अडचण होते. इतर सर्व व्यावसायिकांना 'तुमच्या व्यवसायाची भरभराट होवो,' अशी शुभेच्छा देता येते. डॉक्टरला असे म्हणणे म्हणजे रोगांची व रोग्यांची संख्या वाढो, असे म्हणण्यासारखे आहे.

डॉक्टर जे प्रिस्क्रिप्शन लिहितात, ते फक्त औषध विक्रेता, दस्तुरखुद्द डॉक्टर आणि ब्रह्मदेव यांनाच वाचता येते असे म्हणतात. माझे वडील डॉक्टर होते. ते म्हणायचे की, 'ॲलोपॅथी, होमिओपॅथी किंवा कुठल्याही पॅथीबरोबर पेशंटला सिंपथीची ही गरज असते. शरीरावर इलाज करण्याबरोबर त्याच्या मनावरही इलाज करण्याचे काम डॉक्टरने केले तर रोगाविरुध्दची लढाई जिंकणे जास्त सोपे असते.' डॉक्टरांच्या औषधोपचाराबरोबर डॉक्टरांचे आश्वासक शब्द, स्पर्श हा व्याधीग्रस्त शरीराला नवी उमेद व ऊर्जा देणारा असतो. असा डॉक्टर पेशंटला देवदूत वाटला नाही तरच नवल?

◆◆

# फेसबुकवरचा फसफसाट

फेसबुकवर स्नेहाची फ्रेंडशिप दिवसेंदिवस वाढतच होती. तिच्या छान छान पोझेसमधील छायाचित्रांना तर खूप 'लाईक्स' मिळायचे. एक मित्र लिहायचा 'वॉव'. दुसरा लिहायचा 'वॉव, वॉव'. तिसरा लिहायचा 'वॉव, वॉव, वॉव...' वॉव वॉवची ही काव काव वाढतच जायची असो. मुद्दा असा की, छान टाइम पास व्हायचा. आताही तिने तिच्या फेसबुक अकौंटवर एक 'पोस्ट' शेअर केली. बस्स, अन् या वर उदंड प्रतिक्रिया व प्रतिसाद मिळाला. त्याचा वृत्तांत येणे प्रमाणे–

स्नेहाची पोस्ट : 'राधा ही बावरी...'

सुदीप : वॉव!

सुश : राधा नाही तरी बावळटच आहे.

प्रियंका : अग सीरियलमधली नाय. कृष्णाची राधा...

ओम : बावळट व बावरी यात फरक आहे. बावळट कुठली...

ओंकार : खरं तर राधा हे एक सुंदर मिथक आहे... प्रेमाचं... स्वप्नाचं...

सुदीप : वॉव !

अभिनव : नाही तरी आपल्या देशाची सांस्कृतिक घसरण व्हायला लागली आहे.

व्योमकेश : कृष्ण एक विलोभनीय व्यक्तिमत्त्व होतं. तन्मयतेने बासरी वाजविणारा कलावंत तसेच गीता सांगणारा तत्त्वज्ञ.

सुदीप : वॉव ।

आदित्य : चौरसिया बासरी वाजवतात तेव्हा काय माहोल तयार होतो. व्वा...

खंडेराव : च्यायला देशापुढे केवढ्या समस्या आहेत. बंधूंनो व मैत्रिणींनो जागे व्हा...

प्रेम : आम्ही जागेच आहोत खंडेराया. पण झोपेचं सोंग घेतलेल्यांना कोण जागं करणार?

सुदीप : वॉव !

प्रज्ञा : आपण केवळ फॅरेल विल्यम्सच्या 'हॅपी' व 'गेट लकी'च्या मागे वेडे होतो. हे योग्य नाही.

इशान : का होऊ नये, बाय द वे आपल्याकडे काय आहे?

शुभम : बाबाजी का ठल्लू

सुशांत : मेरे पास माँ है.

ऋतु : तिला तुझ्याजवळच ठेव. हिंदी, मराठीतील सीरियल बघून बघून सुनांना खूप छळायला लागली आहे ती.

चैतन्य : जिसने हमें जनम दिया वो भगवान है...

ऋषभ : लेकिन हम तो इन्सान है...

सुदीप : वॉव !

माधुरी : अलीकडे ट्रेंड बदललाहे...

ऋषी : कशाचा?

अनुष्का : पण माईंड सेट कुठं बदलला आहे?

प्रियंका : अगं पण काही ट्रॅडिशनही चांगल्या आहेत...

रेखा : होय ना. किती छान पुरणपोळ्या करतात आपल्याकडे....

अनुजा : ईऽ मला तर पिझ्झा नि बर्गर खाल्याशिवाय झोप येत नाही.

खंडेराव : स्वदेशी वडापाव खा साल्यांनो...

अनुजा : पाव कुठं स्वदेशी आहे? यू स्टूपिड.

खंडेराव : पावाची कन्सेप्ट ग्लोबल आहे पण लोकलच खातो ना..

कल्पेश : खरं म्हणजे ऑक्सफर्ड व केंब्रिजला केवढी मोठी परंपरा आहे.

प्रथमेश : ऑक्सफर्ड पूर्वी आपल्याकडे नालंदा विश्वविद्यालय होतं...

कल्पेश : आता कुठाय?

खंडेराव : च्यायला देश कुठं चाललाय...

कल्पेश : कुठे?

अभिषेक : मला काय माहीत?

सोहम : सगळा सिस्टिमचा दोष आहे. नाही तर आपला देश टॉपला राहिला असता...

चंदन : देश टॉपला राहण्यासाठी सिस्टिम्स चांगल्या हव्यात.

सोहम : तेच तर म्हणतोय मी. यू डम्ब.

नील : चांगलं नेतृत्व कुठाय?

प्रज्ञा : का? धोनी नाही का?

नील : प्रज्ञा, यू शूड अंडरस्टँड द डिफरन्स बिटविन अ कंट्री ॲण्ड क्रिकेट...

स्नेहा : राधा कुठाय?

चंदा : कोण राधा? ती कालपासून कामाला आलीच नाही.

कल्पेश : ती बहुधा कृष्णाच्या शोधात गेली. येईल गोरज मुहूर्तापर्यंत.

चारू : मीरा का है श्याम बोलो राधा का है श्याम...

खंडेराव : 'श्यामची आई वाचा साल्यांनो...

प्रज्ञा : शिव्या देऊ नये श्याम...

आर्वी : जयपूर लिटररी फेस्टमध्ये काय धम्माल झाली. महाल काय सुपर्ब आहे तिथले....

सुदीप : वॉव!

आर्वी : तिथे जपानी नाटककार हाकानकामारू आले होते. यांचं एक वाक्य कोट करते हं. 'आपण जगायला आलो ते मरण्यासाठीच' सुपर्ब!

सुदीप : वॉव!

स्नेहा : राधा कुठाय?

◆◆

# पितर आणि इतर...

भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्ष म्हणजे पितरांना (व इतरांनाही) संतुष्ट करण्याचा काळ असतो अशी परंपरा रूढ आहे. कावळ्याच्या रुपाने थेट पृथ्वीवर येवून पितरांच्या इच्छा पूर्ण होऊन व त्यांचा आत्मा तृप्त झाल्याने त्यांना मुक्ती मिळते ह्या धारणेतून पितृपक्ष पाळला जातो. आपल्या पितरांना नरकातून किंवा स्वर्गातून, ते जिथं कुठं असतील तेथून पृथ्वीवर येण्यासाठी 'क्यॅजुअल लिव्ह'चा अर्ज त्यांना करावा लागतो काय हे यम किंवा चित्रगुप्तच जाणे. पण पितरांचं एक जावू द्या, इतरांची पितरांसाठी क्यॅजुअल लिव्ह मागताना काय तारांबळ होऊ शकते, याची कल्पना करता येणं शक्य आहे. एखाद्या मल्टी नॅशनल कंपनीत एखाद्या सॉप्टवेअर इंजिनीअरला त्याच्या अमेरिकन बॉसकडे सार्वपित्री अमावस्येसाठी क्यॅजुअल लिव्ह मागायची असल्यास त्या दोघात जे लाइव्ह चॅट होईल ते बहुदा पुढीलप्रमाणे होऊ शकतं.

इंजिनिअर – सर आय वांटेड अ कॅज्युअल लिव्ह फॉर सार्वपित्री अमावस्या...

बॉस – वॉट सार्वपिट्री?

– ही विल कम..

– हू?

– माय पितर...

– हू इज धीस पीटर?

– पीटर नाही सर.. पितर.. अन्सेस्टर...

– ओके. सो?

– पितर विल कम इन द फॉर्म ऑफ क्रो सर..

– वॉट? (बॉस बहुदा यावेळी खुर्चीवर उभा राहिला असावा!)

– क्रो सर.. काव काव..

– काव काव?

– यस सर्. ही विल कम. ही विल टेक घास ऑफ कढी, खीर, भजे, पुरण पोळी एटसेट्रा..

– वॉट इट धीस?

– इट्स अ ग्रेट फन्क्शन सर..

– ओके, ओके.. डू वॉट यू लाइक... अँड वॉट यू सेड द्याट.. ओ या.. कढी. सेंड मी सम कढी बाय कुरियर..

– नो सर कढी कॅन नॉट बी सेंट बाय कुरियर. आय विल सेंड सम ओनियन भजी इनस्टेड...

– ओके. नो प्रॉब्लेम...

खरच पितृ पक्षातील जेवण ही एक अनुभवायची चिज आहे. पंच पक्वान्नाने पितरांना काय आनंद मिळतो याचा फीड बॅक मिळणं शक्य नसलं तरी नंतर इतरांना जो भोजनानंद मिळतो तो वर्णनातीत असतो. असल्या जेवणासाठी मरून पुन्हा कावळा होऊन परत यावसं कुणाला वाटलं तर नवल नाही! मंगेश पाडगावकरांच्या ओळीत थोडा बदल करून सांगायचं झाल तर 'अनंत मरणे झेलून घ्यावी असल्या भोजनासाठी' अस म्हणता येईल. पितृ पक्षाची पद्धत चालू राहाण्याचं हे एक सज्जड कारण असावं. ''बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर'' ही म्हण मराठीत उगीच थोडी पडली!

पितृ पक्षात आणखी एका पक्ष्याला कधी नव्हे तो विलक्षण मान मिळतो तो म्हणजे कावळा. कावळा बिचारा कोकिळे सारखा मंजुळ आवाज काढू शकत नाही. पोपटासारखा तो अक्कडबाज किंवा मोरासारखा देखणा नाही.

मी युरोपात कावळा बघितला तो इंडिअन कावळ्यासारखाच होता. म्हणजे ब्रिटीश किंवा फ्रेंच कावळे गोरे असत नाहीत! काव काव या त्याच्या चिरपरिचित आवाजातच तो ओरडत होता. कावळ्याची प्रजाती हे अशी सार्वत्रिक व सार्वकालिक असल्याने त्याची स्वाभाविकपणे पितरांचा दूत म्हणून निवड झाली असावी. त्याने घास घेतला नाही तर पितरांचा आत्मा अतृप्त आहे असं समजलं जातं.. दर्भाचा कावळा करावा लागतो. अतृप्त इच्छांच निवेदन केल्यावर कधी कधी पटकन कावळा घास घेतो असं म्हणतात. कावळा बसायला व फांदी मोडायला एकच वेळ होणं हा आपण समसमा संयोग मानतो– हे ही विशेष.

हया दिवसात रज तम लहरी वातावरणात असतात असा समज आहे. त्यामुळे हया दिवसात खरेदी विक्रीचे व्यवहार थांबतात. शुभ मुहूर्त नसतात. लग्नाची तर गोष्टच दूर. पण खरं तर याच दिवसात खरेदी निवांत होऊ शकते. बऱ्यापैकी 'बारगेनिंग' करता येतं. जनरल ट्रेन्ड मात्र खरेदी न करण्याकडेच असतो.

अंधश्रद्धा ही अवैज्ञानिक आहे, तर श्रद्धेमुळेही माणस स्वसमजुतीच्या तुरुंगात कैद होतात. (प्रिझनर ऑफ सेल्फ अप्रेहेन्शन) म्हणून विज्ञान निष्ठ व विवेकनिष्ठ असणं हे कालसुसंगत आहे.

अशी पुष्कळ उदाहरणं आस–पास दिसून येतात की, जिवंतपणी आई–बापाची कुणी कदर करत नाही, मृत्युनंतर पितृपक्षातील सर्व सद्धर्म मात्र कटाक्षाने पाळले जातात. पितरांच्या इच्छा पूर्ण न झाल्यास ते पिश्याच्य होऊन मागे लागतील अशा भीतीतून पुण्य गाठीला बांधण्यापेक्षा ज्या पूर्वजांमुळे मनुष्य जन्म लाभला त्यांचे पुण्यस्मरण करण्याचा व त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा पंधरवडा आहे, अशा दृष्टीने पितृपक्षाकडे बघितल्यास यातील अशुभाचे संकेत दूर होऊ शकतात. ही सांस्कृतिकी कशी जपायची व संपन्न करायची हे त्या त्या व्यक्ती विशेषावर सोडून देणं हे चांगलं.

◆◆

# मला वेड लागले प्रेमाचे.....

कार्ल मार्क्सचे गुरू हेगेल हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. एकदा प्रेमात पडलेला एक तरुण विद्यार्थी त्यांच्याकडे गेला व त्याने विचारलं, 'सर, प्रेम म्हणजे काय असतं?' हेगेल हे प्रोफेसर अन् त्यातही फिलॉसॉफीचे. त्यांनी उत्तर दिलं, 'अनादि अनंताच्या निरपेक्ष एकत्वाच्या सूक्ष्मतर भागाच्या वास्तवतेचे आदर्शीकरण म्हणजे प्रेम.' त्या विद्यार्थ्याची काय अवस्था झाली हे माहीत नाही; पण असाच प्रश्न कुणी कविवर्य मंगेश पाडगावकरांना विचारल्यास ते 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं नि आमचं सेम असतं,' असं नक्कीच सांगू शकतात. (आणि ते त्याला समजूही शकतं.)

कथा, कविता, कादंबरी, शिल्प, चित्र, नाटक, चित्रपट, अशा सर्व माध्यमांचा नेहमीचा व आवडीचा विषय प्रेम हा आहे. टीनएज हे तसं अडनिडं वय. निसर्ग नियमा–नुसार मन व शरीरातील बदलाचं हे वय. शरीर व मन या दोहोंच्या दोलायमान अवस्थेतील हे प्रेम जाणत्या–अजाणत्या सीमारेषेवर तरंगत असतं. नजर, स्पर्श, भेट यात संकोच असतो; पण खरं तर खऱ्या प्रेमाला कोणतीही सीमा नसते.

प्रेम हे साहसी असतं; पण कधी कधी या अति साहसामुळे प्रेमवीराची धुलाईही होऊ शकते. एकदा अशाच एका दिलफेक प्रेमवीरानं त्याच्या मित्राशी

पैज लावून कॉलेजातील एका मुलीला 'आय लव्ह यू,' असं मोठ्या दिमाखात म्हटले. ती मुलगी म्हणाली, 'असं का मुडद्या. इकडे ये' अन् तिने त्याच्या कानाखाली एक सणसणीत लगावली. उसकी आवाज बहुत दिनोतक कॉलेजमें गुंजती रही !

मुलगी 'पटवणं' म्हणजे प्रेम नव्हे. असल्या निकृष्ट स्तरावर प्रेमाला आणणं हा प्रेम या भावनेचा अपमान आहे. प्रेमात 'वन वे ट्रॅफिक' ला स्थान नाही. एकतर्फी प्रेमाची नौका निराशेच्या दगडावर आपटून फुटणार हे नक्की. टवाळखोरी, उनाडक्या व असभ्यता याला खऱ्या प्रेमात स्थान नाही. प्रेमाला प्रेमानेच जिंकावं लागतं. गालिबने म्हटल्याप्रमाणे प्रेम ही आग अशी आहे की, 'जो लगाए न लगे, बुझाए न बुझे.' म्हणजे प्रेम ही आग लागता लागत नाही व विझता विझत नाही.

प्रेमात गणित नसतं; तसंच प्रेमाचंही गणित नसतं. प्रेम केलं जात नाही, प्रेम होऊन जातं. 'प्यार होता नहीं, हो जाता है,' असं म्हणतात. का कुणास ठाऊक. हिंदी, उर्दूमधील 'डायलॉगबाजी' व शेरोशायरी प्रेमाला जास्त जवळची आहे. अर्थात प्रेमाची भाषा ही 'शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले,' अशी असते. इन्ग्रिड बर्गमन या हॉलीवूड अभिनेत्रीने म्हटल्याप्रमाणे 'माणसाला मिळालेलं निसर्गाचं सुंदर वरदान म्हणजे प्रेम. प्रेमातील शब्द संपतात, तेव्हा स्पर्शाची भाषा सुरू होते.'

'कशी केली तू माझी दैना, मला तुझ्याबिगर करमेना,' अशा स्थितीपर्यंत नेणारं प्रेम हे आंधळंही असतं; कारण ज्याच्यावर / जिच्यावर प्रेम आहे त्या व्यक्तिशिवाय प्रियकर किंवा प्रेयसीला काही दिसत नाही व सूचतही नाही. प्रेमाचं तत्त्वज्ञान वगैरे काही नसतं. 'प्रेम' हेच तत्त्व आणि प्रेमाची अनुभूती हेच 'ज्ञान' होय. म्हणूनच 'क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव पडो मरणाचा,' असं गोविंदाग्रज लिहितात.

कविश्रेष्ठ कालिदासाने मेघांना दूत करून प्रेमिकांचे संदेश पोहोचविले. संदेश वहनासाठी कबुतरांचाही उपयोग केल्याचे आपण वाचतो. आताच्या प्रेमिकांना एसएमएस, व्हॉटस्अ‍ॅप, चॅटिंग, इंटरनेट, मोबाईल अशी अत्याधुनिक साधने उपलब्ध आहेत. प्रेमाच्या बाबतीतही जग एकमेकांच्या जवळ आलं आहे, असं त्यामुळे म्हणता येईल.

मनापासून एकमेकांवर प्रेम करणाऱ्यांना प्रेम एक समृध्द अनुभवही देतो. मिलनाचा आनंद, विरहाचे दु:ख, भविष्याची स्वप्ने, हळूवार, तरल आठवणींचे अनेकरंगी गोफ, विश्वास, सहनशीलता इ.ची अनुभूती प्रेमामुळे प्राप्त होते. अर्थात यासाठी वैचारिक व भावनिक परिपक्वता हवी.

प्रेमात सगळेच पडतात. उठत कुणीच नाही. जे यातून उठतात, उभे राहतात व आयुष्यभर प्रेम निभावतात, त्यांना सलाम करायचा नाही तर आणखी कुणाला?

◆◆

# पाठीमागे वळून बघताना...

जगाच्या पाठीवर अशी व्यक्ती क्वचितच असेल की, ज्याला (किंवा जिला) पाठदुखी झाली नसेल. किंबहुना पाठ दुखल्याशिवाय पाठ नावाचा आपल्याला शरीराचा हिस्सा आहे हेही जाणवत नाही. परंतु तरीही सामान्यत: व्यवहारात पाठीशी संबंधित अशा अनेक शब्दप्रयोगांचा आपण नेहमी वापर करतो. आता हेच बघा, 'विश्वासघात' केला, असं साधंसोपं न म्हणता 'पाठीत खंजीर खुपसला' अशी धारदार प्रतिमा वापरतो. एखाद्याने हार खाल्ली तर त्याची 'पाठ लागली' व कुणी पळपुटेपणा केला तर त्याने 'पाठ दाखवली', उपरोध व्यक्त करायचा असला तर 'सुसरबाई तुझी पाठ मऊ' आणि प्रश्न पोटापाण्याचा असला तर 'पाठीवर मारा पण पोटावर मारू नका' म्हणून पाठीला दुय्यम स्थानावर ढकलणार. माझ्या पश्चात म्हणायचे असेल तर 'माझ्या पाठीमागे' म्हणणार. एखाद्या व्यक्तीचे (किंवा राजकीय पक्षाचे) तीन तेरा वाजले तर त्याचं 'कंबरडं मोडलं' म्हणणार. एखाद्याची मागाहून झालेली भावंडे असतील तर 'पाठची बहीण' किंवा 'पाठचा भाऊ', मृत्यूनंतर कुणी पैसा-अडका, इस्टेट ठेवली तर 'पाठीमागे ठेवलं', एखाद्याने प्रगती केली नाही तर 'पाठीमागे पडला' आणि एखाद्याचं समर्थन केलं तर 'पाठीशी घालणार'. शाबासकी दिली असं म्हणायचं असेल तर 'पाठ थोपटली' असं

म्हणणार व सपाटून मार दिला तर ‘पाठ धोपटली’ किंवा ‘पाठीचं धिरडं काढलं’ म्हणणार. थोडक्यात म्हणजे आपली पाठ (अर्थात पाठीमागे असल्याने) दिसत नसली तरी पाठीसंबंधी आपण असं सतत बोलत असतो.

आपल्याला पाठ आहे याची जाणीव पाठीत वेदना झाल्यावर प्रकर्षाने जाणवते. खरं तर पाठ म्हणजे चार ठिकाणी वक्र असलेली, मेंदूपासून कमरेपर्यंतच्या चोवीस मणक्यांची साखळी. त्यातून इलेक्ट्रिकची वायर जावी तसा मज्जारज्जूचा म्हणजे चेतासंस्थेचा (नर्व्ह सिस्टिमचा) भाग. संपूर्ण शरीराचं स्पर्शज्ञान व मेंदू ते शरीर आणि उलट असं कम्युनिकेशन असलेला हा शरीराचा अत्यंत महत्त्वाचा भाग होय.

काही पाठदुखीचे प्रकार असे आहेत की, ते जर पाठीमागे लागले तर आयुष्यभर पाठ सोडत नाहीत. पाठदुखीमुळे जर आपण बेडवर पाठ टेकवली तर आप्तेष्ट व मित्र जे उपाय (अर्थात आपुलकीमुळे) सुचवतात त्यात पायाळू मुलाचा पाय पाठीला लावण्यापासून ते पाठीत लाथ घालण्यापर्यंत अनेक उपाययोजनांचा समावेश होतो.

ॲलोपॅथीपासून योगासनांपर्यंत आणि होमिओपॅथीपासून आयुर्वेद, युनानी, आस्टोपथीपर्यंत असंख्य सल्ले मिळू शकतात.पाठदुखी असेल तर डॉक्टर सल्ला देतात. पाठीत जास्त वाकू नका. अशा प्रकारे पाठदुखीमुळे ‘स्वाभिमानी’ लोक निर्माण होतात.

मानेचा स्पाँडेलायसीस झाला तर मान झुकवू शकत नाही. मोडेन पण वाकणार नाही, असा त्यांचा स्वाभिमानी बाणा असतो! कारण वाकले तर मोडलेच म्हणून समजा! मानेचा स्पाँडेलायसीस झाला तर कधी कधी कुत्र्याला अडकवतात, तसा गळपट्टा आवळावा लागतो. आजुबाजूचे (चार पायाचे) कुत्रे गालातल्या गालात मिश्किलपणे ‘आम्हाला पट्टा घालता काय?’ म्हणत बघताहेत की काय अशी शंका जरी आली तरी अशा टवाळखोरांकडे दुर्लक्ष (पाठ केलेलीच बरी) करणं हेच श्रेयस्कर असतं! पाठीवर शाबासकीची थाप किंवा पाठीवरून फिरणारा मायेचा हात यातील कौतुक व जिव्हाळा मेंदूपर्यंत तत्काळ पोहोचविण्याची व्यवस्था निसर्गानेच केली आहे.

आयुष्यातील कृतार्थता व आनंद पाठीच्या द्वारे सहज पोहोचविणारी पाठ

आपल्या दृष्टीआड असली तरी इतरांच्या मात्र दृष्टिक्षेपात असते. जीवन एक प्रचंड मौज आहे. (लाईफ इज इटसेल्फ अन् इंटरेस्ट) असं जे म्हणतात, ते बहुधा अशा गोष्टींमुळेच!

◆◆

# वॉव, यम्मी व यो....

काळानुसार भाषाही बदलत जाते. गुलामगिरीच्या मानसिकतेतून अद्याप आपली सुटका झालेली नसल्याने इंग्रज जरी गेले, तरी इंग्रजीचं भूत मात्र वेताळ पंचविशीतील वेताळाप्रमाणे आपल्या मानगुटीवर बसलेलं आहे. किंबहुना या भूताने सर्वच प्रादेशिक भाषांचा गळा आवळलेला आहे. बालवाडीपासून याची सुरुवात होते. मामाच्या चिरेबंदी वाड्याच्या भिंती आता कोसळून गेल्या आहेत व चांदोबाही आता निंबोणीच्या झाडामागे लपत नाही. चारच महिने पडणारा पाऊस हा सर्वार्थाने आपला जीव की प्राण आहे. म्हणून 'येरे येरे पावसा' म्हणण्यात गंमत आहे. इंग्रजी बालगीतात (नर्सरी ऱ्हाईम) 'रेन रेन गो अवे' हे बालगीत आहे. ब्रिटन वा युरोपात वर्षभर कमी–जास्त पाऊस असतो. सूर्यदर्शन लवकर होत नाही. तिथे पावसाचा कंटाळा येणं स्वाभाविक आहे. पण आपल्या देशात 'रेन रेन गो अवे' म्हणून कसं चालेल?

माझ्या नातवाला मी जेव्हा गोष्ट सांगतो, तेव्हाचा संवाद होतो तो असा–

एका जंगलात एक सिंह असतो.

सिंह म्हणजे...

लायन...

हं, लायन...

आणि एक असतो उंदीर...

उंदीर म्हणजे...

माऊस...

अच्छा!

एकदा काय होतं की तो माऊस लायनच्या अंगावर उडी मारतो.

उडी म्हणजे...

उडी म्हणजे.... जंप. तर लायनच्या अंगावर...

अंगावर म्हणजे....

म्हणजे बॉडी... हां तर लायनच्या बॉडीवर माऊस जंप मारतो...

मी एकदाचा हुश्श करून त्याला समजणारं मराठी वाक्य पूर्ण करतो. यावर त्याची प्रतिक्रिया असते 'वॉव...'

भाषा श्रेष्ठ वा कनिष्ठ अशी नसतेच मुळी. पण स्वभाषेतून संस्कृतीचं वहन होतं. स्वभाषा, राष्ट्रभाषा व जगभाषा हा क्रम बहुधा उलटा झाला आहे. ग्लोबलायझेशनमुळे बरंच 'गडबडायझेशन'ही झालेलं आहे. ते बरं की वाईट माहीत नाही. पूर्वी कोर्ट म्हणजे एकतर टेनिसचं असे किंवा न्यायालयाचं असे. पण आता फूड कोर्ट हायवेलगत दिसायला लागले आहेत. या कोर्टात लोक यथेच्छ पोटपूजा करताना दिसतात. व्यायामशाळांचे आता 'हेल्थ स्पा' तर किराणा दुकानाचे मॉल व कार्यालयाचे 'वर्क स्टेशन', स्वादिष्ट (टेस्टी) खाद्यपदार्थांसाठी आता 'यम्मी' असं किंचाळावं लागतं. काही चांगलं वाटलं तर 'वॉव' आणि मनासारखं काही घडलं तर मुठी आवळून, गाडीचा गिअर खेचतात तशी हाताची हालचाल करून पुन्हा तोंडाने 'य्योऽ' असं उद्गारता आलं की थेम्स किंवा मिसिसिपीमध्ये घोडं न्हालं म्हणायचं. (अर्थात आपल्याकडे गोदावरीत जसं 'काहीही' धुता येतं तसं तिथं काही करता येत नाही, ही गोष्ट निराळी) अनौपचारिक असं बोलीभाषेतील शब्द (स्लँग) प्रत्येक भाषेत असतात. आश्चर्य आनंद, निराशा अशा विविध भावना व्यक्त करणारा फ्रेंच भाषेतील अनौपचारिक उद्गार 'ओ लला!' मराठीतील 'अय्या' व 'इश्श' हे आता बहुधा डिक्शनरीतच सापडतील.

वस्तुत: मराठी भाषेतील अहिराणी, मालवणी, वैदर्भीय व अन्य कितीतरी

बोलीभाषांमध्ये गोडवा व ठसकेबाजपणा दोन्ही आहेत. पण आपल्या मनात 'ज्ञानबा तुकाराम' असले तरी व्यवहारात मात्र 'मराठीचं काय काम?' अशी अवस्था आहे. ज्ञान, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, न्याय, वैद्यक, प्रसारमाध्यमे, कला व संस्कृती मराठी विकीपीडिया या सर्व क्षेत्रात मराठी भाषेचा वापर वाढो अशी सदिच्छा व्यक्त करणं एवढंच सामान्य माणसाच्या हाती आहे. दुसरं काय?

◆◆

# आली दिवाळी...

कोजागिरी संपताच दिवाळीची चाहुल लागते. दिवाळीचा सुगंध वातावरणात हळू हळू तरळू लागतो. रंग व प्रकाश पूजनाचा हा उत्सव 'मी येतोय' हे अनेक प्रकारे सांगत असतो. दिवाळी हा आनंदाचा वर्षावच असतो. लहानपणातील शाळेतील चांगले वाईट गुरुजी आठवणीच्या फडताळात जसे कायमचे बसलेले असतात, तशीच लहानपणीची दिवाळीही आयुष्यभर रुंजी घालत रहाते. त्यावेळी घरीच (बहुदा डालडा तुपात) तळल्या जाणाऱ्या करंज्या, लाडू, चकल्या, चिवडा यांचा घरभर दरवळणारा वास, दिवाळीत घेतलेल्या नव्या कोऱ्या कपड्यांचा वास. दिवाळीच्या दिवशी भल्या पहाटे उठवून, अंगाला तेल व उटणे लावून, दिवाळीसाठी घेतलेल्या खास साबणाने आंघोळ करून केलेली आंघोळ, दिवाळीच्याच निमित्ताने आणलेले सुंगधी तेल डोक्याला चोपडून दिवाळीच्या स्वागताला सज्ज होत. मिळेल तेव्हा स्वयंपाक घरात जाऊन लाडू वा करंजीचा बोकाणा भरणे हे कामही होत असे. संध्याकाळी लक्ष्मी पूजनानंतर फटाक्यांचा धमाका असे. कार्तिक शुद्ध बलीप्रदा म्हणजे पाडव्याला माझ्या गावी अशी प्रथा होती की लोक सर्व ओळखीच्या मित्रांकडे व नातेवाईकांकडे जात. मोठ्यांना नमस्कार करीत. घरोघर फराळाची ताटे जात. भाऊबीजेला बहिणी घरी येत. घरात सगळा

गलबला, लहानांवर खोटं रागावणं, आरडाओरड व हास्यविनोद यामुळे घर गजबजून जात असे. आकाशदिवा तर घरीच बनवत. त्यासाठी लागणाऱ्या बांबूच्या काड्या, रंगीत कागद, खळ (मैदा उकळवून तयार केलेली गोंद) हे सगळं जमवून आकाश कंदील बनवत. आज सगळ काही रेडिमेड मिळतं. रेडिमेड मिळत नाही तो फक्त जिव्हाळा.

पण, काळानुसार दिवाळीचं स्वरुप बदललं. पण, आनंदाचा, प्रकाश पूजनची भावना मात्र तीच आहे. अंधारावर मात करण्याचा संदेश आजही तोच आहे. दिवाळी आता अधिक ग्लॅमरस झाली आहे एवढंच.

इंटरनेट, व्हाटसअॅप व इतर अनेक मेसेंजरमुळे इलेक्ट्रॉनिक शुभेच्छापत्रांची मांदियाळी आहे. एक भाऊ दुसऱ्या भावाला विचारतो (अगदी अमिताभ बच्चनच्या थाटात... म्हणजे एक खांदा पाडून!) ''मेरे पास रॉकेट है, फुलझडी है, बॉम्ब है, तेरे पास क्या है?'' दुसरा भाऊ उत्तरतो ''मेरे पास माचिस है!'' असे गंमतीदार जोक्स शेअर होताहेत.

दिवाळीचा सण व निवडणूकांचा फड हे यंदा एकत्रच आले. कुणाचा फटाका फुटणार व कुणाचा फुसका ठरणार हे दिवाळीच्या या मोसमात ठरणार.

या आनंदाच्या प्रसंगी ज्यांच्या जीवनात अंधार, दु:ख व दारिद्र्य दाटलेलं आहे अशांची आठवण आपण ठेवायला हवी. जसं छोटीशी पणती अंधार दूर करते, त्याप्रमाणे आपले छोटेसे प्रयत्नही एखादयाच्या आयुष्यात प्रकाशाचा किरण निर्माण करू शकतात. आजच्या भाषेत दिवाळी शुभेच्छा दयायच्या असल्यास मी म्हणेन, ''सर्वांना मायक्रोसॉफ्ट एवढी संपत्ती, मॅकडोनॉल्डची भरभराट, व्हाटसअॅपची लोकप्रियता, हिमालयाची शांतता (बिन आवाजाचे फटाके फोडल्यास) लाभो, ही कॅडबरीसारखी शुभेच्छा.''

◆◆

# लोकशाहीच्या नावानं चांगभलं...

इलेक्शन म्हटल्यावर आपल्या देशातील विविध घटक झोपेतून ताडकन् उठल्यासारखे जागे होतात. विशेषतः टी.व्ही.च्या विविध चॅनलची चलती झाल्यानंतरच्या काळात सर्व्हे, मुलाखती, भाषणे, राडेबाजी, विशेष वार्तापत्रे यांची धूम उडाली आहे. प्रिंट मीडियाही अर्थातच मागे नाही. शेषन यांनी निवडणुकांमध्ये बऱ्यापैकी शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. पण मीडियामार्फत निवडणूक ज्वर चढायला (की चढवायला) सुरुवात होते. सामान्य मतदार की जो निवडणुकांमधील सर्वात महत्त्वाचा घटक आहे तो मात्र त्याच्या दैनंदिन विवंचनेत मग्न असतो.

खरं म्हणजे आपण कुणाला मत देणार हे गोपनीय असतं. या गुप्ततेशी सर्वसाधारण मतदार इमान राखतो. सार्वजनिकरित्या तो हे उघड करीत नाही. त्यामुळे निरनिराळ्या वाहिन्यांच्या सर्व्हेमध्येही ही बाब उघड करण्यास तो नाखूश असतो. त्यामुळे या सर्व्हेची सत्यता टांगणीला असते. पाच वर्षातून कधी तरी एकदा त्याला नमस्कार करणाऱ्या व नंतर ढुंकूनही न पाहणाऱ्या उमेदवाराकडे म्हणूनच तो तटस्थपणेच पाहतो. पण काही मतदार हे 'मतदारपण' टेचात निभावतात. उदाहरणार्थ एका मतदाराने घरावर पाटीच लावलेली होती. 'दुपारी बेल वाजवून आमची झोपमोड केल्यास तुम्हाला

मत मिळणार नाही 'किंवा' लोडशेडिंग चालू आहे. दरवाज्यावर खटखट करू नये. वीज आणा व मग मत मागायला या.'

खरी चंगळ कार्यकर्त्यांची असते. त्यांची सर्व व्यवस्था उमेदवाराला करावीच लागते. 'आधी द्या मटन, मग दाबीन तुमच्या मताचं बटन' असं तो (कार्यकर्ता) म्हणाला तर त्यात त्याचं तरी काय चुकलं? घोषणा द्यायच्या, (म्हणजे घसा खरवडायचा) उन्हातान्हात घामाघूम होत फिरायचं. झेंडे मिरवायचे, प्रसंगी दगड खायचे. म्हणजे बघा. कार्यकर्त्यांचं काम किती अवघड आहे. कार्यकर्त्यांनाच या काळात काम मिळतं असं नव्हे तर प्रिंटिंग प्रेस, फ्लेक्स बोर्ड तयार करणारे, झेंडे, मुखवटे, बॅनर्स, केटरर्स, टूर ऑपरेटर्स, मंडपवाले, लॉन्स व सभागृह इ. सगळ्यांनाच भरपूर काम असते. पेट्रोल व डिझेलची टंचाई असलेल्या या देशात पेट्रोल, डिझेलचा सर्वाधिक वापर बहुधा याच काळात होत असावा.

जपान, जर्मनी, इंग्लंड व पश्चिम युरोपीय देश दुसऱ्या महायुद्धात पूर्णपणे उद्ध्वस्त झाले होते. याच सुमारास साधारणपणे आपला देशही स्वतंत्र झाला. या काळात जपान व युरोपातील देशांनी रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य, निवारा या सर्व सोयींनी ते ते देश समृद्ध केले. कायदा, सुव्यवस्था, पारदर्शकता या उत्कृष्ट व्यवस्था निर्माण केल्या. सामान्य माणसाचं जीवन सुखकर करणं हे त्यांच्या विकासाचं प्रमुख सूत्र होतं व आहे. या मधल्या काळात आपल्या शेजारी असलेल्या चीननेही प्रगतीचे अनेक टप्पे पार केले. मानवी विकास निर्देशकांच्या बाबतीत जगातील १८६ देशात २०१३ मध्ये भारताचा क्रमांक १३६ वा होता! प्रगत देशांच्या (स्वीडन, नॉर्वे वगैरे) तर दीडएकशे वर्षे आपण मागे आहोत. आपल्या देशातील लाखो माता-भगिनी उघड्यावर शौचविधी करतात. बांगला देशपेक्षा हे प्रमाण आपल्या देशात अधिक आहे. ३०-३२ कोटी वंचितांचे प्रश्न मीडियातून कुठे मांडले जातात? लोकांची मानसिकता व्यक्तिपूजक व नेतृत्वाची सरंजामी असल्यास विकास कसा होणार? देशाने अजिबात प्रगती केली नाही असा याचा अर्थ नव्हे. परंतु पारदर्शक व कार्यक्षम व्यवस्था व अमलबजावणी व गुणवान नेतृत्व निर्माण करण्यात आम्ही सक्षम ठरलो नाही. 'इंडियाज ट्रिस्ट वुईथ रियॅलिटी' लिहिणाऱ्या जॉन इलिऑट या पत्रकाराने म्हटल्याप्रमाणे 'भारतातील

लोकशाही ही अपयश झाकण्याचं एक साधन (फिग लिफ) झालं आहे.' 'आमचा देश १२० कोटींचा आहे. आमच्या देशात लोकशाही आहे तेव्हा हे असं चालायचचं' ही धारणा बदलणं गरजेचं आहे. निवडणुकांमध्ये सुधारणांना प्रचंड वाव आहे. प्रचंड निसर्गसंपदा व तरुण मनुष्यबळ असलेला हा प्राचीन देश खरोखर फार सुंदर आहे. महात्मा गांधींनी विकासाची अतिशय सुरेख व्याख्या केली आहे. 'या देशातील शेवटच्या माणसाच्या डोळ्यातील अश्रू जेव्हा पुसला जाईल तेव्हा खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येईल' अमेरिकन जस्टिस लर्नेड हॅण्ड या विधिज्ञाने म्हटल्याप्रमाणे 'लोकशाही ही लोकांच्या हृदयात असली पाहिजे. त्या ठिकाणी लोकशाही मृत झाल्यास कोणतीही घटना, कोणताही कायदा व कोणतेही न्यायालय तिला वाचवू शकत नाही.' लोकशाहीची आशा सामान्य भारतीय माणसाच्या मनात अद्याप धुगधुगत आहे हे या देशाचं सुदैव आहे.

◆◆

# डोळे हे फिल्मी गडे...

'डोळे हे जुल्मी गडे रोखुनी मज पाहू नका. जादुगिरी त्यात पुरी, येथ उभे राहू नका' ही कवीवर्य भा.रा.तांबे यांची कविता असो की, 'नयन तुझे जादूगार' सारखे गीत असो, हळूवार प्रणय भावना व्यक्त करतांना डोळ्यांचं महत्त्व दृष्टीआड करता येत नाही. पण, प्रणय भावनाच काय सर्वच प्रकारच्या भाव-भावना डोळ्यातून व्यक्त होतात. प्रेम, अगत्य, आत्मियता, तुच्छता, उदासी, हर्ष, खेद, द्वेष, त्वेष, खुन्नस, खुनशीपणा, छद्मीपणा, आर्तता, राग, चिंता, हरवलेपण, खोडकरपणा, जरब. आत्मविश्वास, आर्जव, मार्दव अशा माणसाच्या सगळ्या भावना डोळ्यातून व्यक्त होतात. डोळा हा माणसाच्या मनाचा आरसा आहे. कुठलीही भावना व्यक्त न करणारे डोळे ही 'निर्विकार' भावच व्यक्त करतात. पापणीच्या पंखाखालचे डोळे ही माणसाला मिळालेली अद्वितीय देणगी आहे.

व्यावहारिक भाषेतही 'डोळा' डोकावतच असतो. डोळ्याला डोळा भिडणे, डोळे उघडणे, डोळे मिटणे, डोळ्यात येणे, डोळेझाक करणे, डोळे निवणे, डोळे थकणे, डोळा मारणे, डोळे मिचकावणे, डोळे थिजणे, डोळा लागणे इ. क्रियापद बदललं की डोळ्यांचा अर्थ बदलतो!

देव-देवतांच्या मूर्तीमध्ये तर डोळ्यांचं विशेष महत्त्व असतं. गणेशमूर्तीची

निवड करतांना गणेशाच्या डोळ्यातील शांत, सात्विक, सोज्वळ व पवित्र भाव व्यक्त करणाऱ्या मूर्तीकडे आपला ओढा असतो.

लहान मुलांच्या स्वच्छ व पाणीदार डोळ्यातून निरागसता व संबंध जगाविषयीचं कुतुहल डोकावत असतं. मुलांचा खोडकरपणा व मिश्किलपणाही डोळ्यातून लपत नाही. मनात काहीही असो. डोळे खोटे बोलत नाहीत. डोळे हे सख्खे शेजारी असले व जिवंत असेपर्यंत एकमेकांना भेटत नसले तरी एकच दृश्य ते समन्यायाने बघतात. येथे दोन्ही डोळे निरोगी आहेत हे गृहित धरलं आहे. ’शब्दावाचून कळले सारे, शब्दांच्या पलीकडले’ हे समजण्याची व कळण्याची भाषा फक्त डोळ्यांनी बोलली जाते.

अभिनयात तर डोळे हे महत्त्वाची ’भूमिका’ बजावतात. अभिनयाच्या अगणित छटा डोळ्यामधून व्यक्त होतात. अभिनेता किंवा अभिनेत्रीचे डोळे म्हणूनच बोलके हवेत. त्याशिवाय ’डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे’ असे म्हणता येणार नाही.

डोळे आनंद व दु:ख अश्रुंच्या रुपात व्यक्त करतात. दु:खात व भावनावेगाने जशी डोळ्यात आसवं येतात, तशीच आनंदामुळेही येतात.

रंगांची भाषा डोळ्यांना जेवढी कळते तेवढी कुणाला कळणार? काही रंग तर असे की जे केवळ डोळ्यांनीच अनुभवता येतात. निसर्गाने रंगांची प्रचंड उधळण केलेली आहे. नुसते विविध रंगच नव्हे तर मन मोहून टाकणारी रंगसंगती निसर्गात दिसून येते. पक्षी, प्राणी, फुले, फुलपाखरे, झाडे, फळे, दगड, पाणी यांचे निरनिराळे रंग बघितले तर रंगांचा हा चमत्कार सहज दृष्टीस पडतो. हे रंग मेंदूपर्यंत पोहोचविण्याचे कार्य डोळे करतात. जीवनातील केवढा मोठा अर्थ आणि आनंद डोळ्यांमुळे साठविलेला आहे. दृष्टीहिनांच्या अंधारलेल्या जगाची आपण केवळ कल्पनाच करू शकतो.

डोळ्यांचा रंग कुठलाही असला तरी डोळ्यात उमटणाऱ्या भावांचा रंग एकच असतो. डोळ्यांचा प्रवास हा ’डोळे हे जुल्मी गडे’ पासून ’डोळे हे फिल्मी गडे’ पर्यंत झालेला असला तरी आपली ’दृष्टी’ मात्र स्वच्छ व निर्मळ हवी म्हणजे झालं.

◆◆

# क्लिक क्लिक

एक फोटोग्राफर एकदा डिनर पार्टीसाठी त्याच्या मैत्रिणीच्या घरी गेला. त्याने तिला खूप फोटो दाखविले. ते पाहिल्यावर मैत्रिण म्हणाली, 'फोटो अतिशय सुरेख आहेत. तुझ्याकडे नक्कीच खूप चांगला कॅमेरा असेल.' यावर तो काही बोलला नाही, पण डिनर संपल्यावर तो मैत्रिणीला म्हणाला, 'जेवण खूप छान होतं. तुझ्याकडे नक्कीच खूप चांगली भांडी असतील.'

हजार शब्दात जे सांगता येत नाही ते एका छायाचित्रात सांगता येते. मनाला व डोळ्यांना भावणाऱ्या एखाद्या दृश्याची दृश्यात्मकता आणि एखादया व्यक्तीचं व्यक्तिमत्त्व छायाचित्रात जिवंत करणं ही मोठी कला आहे. यासाठी कॅमेऱ्याच्या मागचा डोळा हा कलावंताचा असला पाहिजे. विशिष्ट क्षण–क्षणात बंदिस्त करु शकतो तो खरा कलावंत छायाचित्रकार होय. रघु राय आणि गौतम राजाध्यक्ष यांची छायाचित्र म्हणूनच खिळवून ठेवतात.

अनेकदा कार्यक्रमात सन्माननीय व्यक्तींचे शाल, श्रीफळ वगैरे देऊन सत्कार होतात. फोटोग्राफर जर 'रेडी' व 'स्टेडी' नसेल तर शाल वगैरे देण्याचा कार्यक्रम रिपीट केला जातो. चांगल्या फोटोग्राफीसाठी 'टाईमिंग सेन्स' जबरदस्त असला पाहिजे.

पूर्वी बॉक्स कॅमेऱ्यांचा एक जमाना होता. त्यावर एक मोठा काळा पडदा

असे. फोटोग्राफर त्यात घुसून लेन्स व फोकस यांची 'ॲडजस्टमेंट' करीत. लेन्सवरच झाकण काढून पुन्हा बंद करीत. फोटो पेपरवर फोटो प्रिंट येण्यापूर्वी तो चक्क पाण्यात बुडवित व कपडे वाळवतात तसे दोरीला आकडे लावून फोटो वाळवत. ते वाळल्यावर ब्रशने फोटोला 'टचअप' करीत. नंतर कटींग वगैरे करून फोटो हातात येई. त्यामुळे 'फोटो काढणे' हा सोहळा असायचा. जत्रेच्या दिवसात अशा फोटोग्राफरचा एक फिरता स्टुडिओ असे. त्यात मोटार कार, विमान, नट–नट्यांचे 'कट आऊट' लावलेले असत. त्यात बरेच हौशे व नवशे फोटो अगदी दिमाखात काढून घेत.

नंतर रोल फोटोचे दिवस आले व गेले. आता डिजिटल फोटोग्राफी होत आहे की फोटोग्राफीतील कौशल्य मागे पडून तंत्रज्ञानातील कौशल्य व ज्ञान महत्त्वाचे ठरत आहे. मोबाईल फोनमध्ये कॅमेरा असल्याने आता प्रत्येकजण फोटोग्राफी करु शकतो. ते साठवण्याची व शेअर करण्याची सोय असल्याने आता फोटो प्रिंटचीही तशी आवश्यकता उरली नाही. एका क्लिकने झकास फोटो कुणालाही काढता येतात.

फोटो काढायचा आहे असं म्हटलं की अनेकदा बरेच लोक अकारण गंभीर होतात. अशावेळी फोटोग्राफर 'से चीझ' म्हणून (बळेच) हसू आणण्याचा प्रयत्न करु शकतो. कारण, 'चीझ' म्हणताच ओठ विलग होऊन हसण्याचा आभास निर्माण करता येतो.

जुन्या कॅमेऱ्याप्रमाणेच जुने फोटोही खूप रमणीय असतात. ब्लॅक ॲण्ड व्हाईट फोटो काढण्यात खरच खूप आव्हान असतं. तंत्रज्ञानाने या गोष्टी आता सोप्या केल्या आहेत.

प्रसंग सुखाचा असो की दु:खाचा, फोटो हा आपल्या आठवणींचा केवळ साक्षीदार नसतो तर मूर्तिमंत आठवण उभी करणारा असतो. हे मात्र नक्की.

◆◆

# ढाई आखर प्रेमका...

'शिकणे' ही गोष्ट चांगलीच आहे; पण खूप शिकलेली व्यक्ती खूप चांगली असेलच असे नाही व खूप चांगली व्यक्ती खूप शिकलेली असेलच असे नाही. अनेकदा असेही दिसून येते की, निरक्षर व्यक्ती सुसंस्कृतपणे वागते, तर तथाकथित सुशिक्षित व्यक्ती अत्यंत असंस्कृत व अडाणीपणाने वागते. शेवटी माणूस म्हणून कोण कसा आहे हे महत्त्वाचे असते. माणूस म्हणून स्वत:ची उंची वाढविण्यासाठी प्रयत्नपूर्वक काही गोष्टी शिकाव्या व आचरणात आणाव्या लागतात.

शाळा-कॉलेजातील अनेक 'ड्राप आऊटस्' व्यक्तींनी दिगंत यश व कीर्ती मिळविल्याची अनेक उदाहरणे देता येतात. ॲपल व आय पॅडचा निर्माता स्टीव्ह जॉब्स व मायक्रोसॉफ्ट या सिस्टीमचा जनक बिल गेटस् हे दोघेही कॉलेज ड्रॉप आऊटस् होते. गोल्फचा बादशहा टायगर वुडस्, फेसबुकचा निर्माता मार्क झुकरबर्ग हे कॉलेजचे शिक्षण पूर्ण करू शकलेले नाही. आजिम प्रेमजी, गौतम अदानी हे भारतीय अब्जाधीशही पदवीधर नाही; परंतु हजारो पदवीधरांना त्यांनी रोजगार पुरविला आहे. उपजीविका किंवा निर्वाहाचा संबंध शिक्षणाशी अनेकदा जोडला जातो. त्याला छेद देणारी ही उदाहरणे आहेत. अर्थात किमान शिक्षण हे प्रत्येकाला मिळायलाच हवे. मुख्य म्हणजे अनौपचारिक

पध्दतीने का होईना शिकत राहण्याची तीव्र इच्छा हवी. सचिन तेंडुलकरला बारावीची परीक्षाही देता आलेली नाही; परंतु क्रिकेटचा देव होण्यापर्यंतची त्याची खडतर तपश्चर्या व समर्पण वृत्ती सगळ्यांना माहीत आहे. जे.आर.डी. टाटांना एकदा मुलाखतीत विचारण्यात आले, तुम्ही प्रचंड आर्थिक साम्राज्य निर्माण केले. तुम्हाला यातच अधिक आनंद वाटतो काय?' जे.आर.डी. उत्तरले, 'मला नवीन काही निर्माण केल्याचा (क्रिएटिव्हिटी) आनंद सर्वात जास्त होतो. सर्वांसोबत काम करण्याचा आनंद अधिक आहे.' जे.आर.डी. माणूस म्हणूनही उत्तुंग होते. शिक्षणाने ज्ञानाच्या कक्षा विस्तारतात. मनाच्या कक्षा विस्तारणारे शिक्षण मात्र जगाच्या व्यवहारातून व प्रत्यक्ष अनुभवातूनच मिळते.

आपल्याकडे शिक्षण अद्यापही एकांगी आहे. म्हणजे अभियांत्रिकी किंवा विज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्यांना कम्युनिकेशन स्किल, भाषा, मानवी व्यवहार व वर्तन, अकौंटन्सी, व्यवस्थापन, निर्णय प्रक्रिया, सार्वजनिक प्रशासन, कायदा इ.बाबत पदवी स्तरापर्यंत काहीएक ज्ञान मिळत नाही. या एकसाची शिक्षणातून सुटका होणे गरजेचे आहे. 'जो जे वांछिल तो ते शिको,' अशी व्यवस्था जेव्हा निर्माण होईल तो सुदिन. एक फार सुरेख वाक्य आहे. 'मी बुध्दिमान म्हणून जन्माला आलो; पण शिक्षणाने माझी दुर्दशा केली.' (आय वाझ बॉर्न इंटेलिजंट बट एज्युकेशन रूईन्ड मी.) सर्जनशीलतेची भ्रूण हत्या करणारे शिक्षण काय कामाचे? शेवटी महात्मा कबीर म्हणतात ते खरे आहे. 'पोथी पढै पढै जग मुआ पंडित भया न कोय ढाई आखर प्रेम का पढै सो पंडित होय.' पुस्तके वाचून कुणी विद्वान होत नाही. प्रेम या अडीच अक्षरांचा अर्थ ज्याला कळला तोच विद्वान होय.

◆◆

# सत्यम ब्रूयात प्रियं ब्रूयात...

मकर संक्रातीला सूर्याचे उत्तरायण सुरू होते. थंडीच्या दिवसातील तिळाचे महत्त्व तिळगुळाच्या वड्या, लाडू, गजक अशा अनेक प्रकारातून आरोग्यदायी संदेशही पोहोचविते. तिळगुळाबरोबर गोड बोलण्याचे आवाहनही आपण करतो.

संस्कृतमध्ये एक सुंदर श्लोक आहे. 'सत्यम ब्रूयात प्रियं ब्रूयात न ब्रूयात सत्यम अप्रियम, प्रियचं नानृतं ब्रूयात.' म्हणजे सत्य असं बोलावं की ते प्रिय किंवा सर्वांना रुचणारं असावं, अप्रिय सत्य बोलू नये, आणि प्रिय असत्यही बोलू नये. परंतु एकाच वेळी सत्यही बोलायचं आणि प्रियही बोलायचं ही कठीण गोष्ट आहे. म्हणजे असं की, माणसाच्या जवळच्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याला ते कळवायचं असल्यास 'ती किंवा तो मेला-मेली आहे, लवकर या' असे कळवत नाही. तो किंवा ती मृत झाली आहे हे सत्य आहे, पण म्हणून तसे म्हणणे अप्रिय आहे. मग आपण यातून असा मार्ग काढतो की, 'अमुक एक अत्यवस्थ आहे, गंभीर आहे, लवकर या' वगैरे. दु:खाच्या वार्तेचा हा एक प्रकारे हा 'क्ल्यू' असतो. तसंच प्रिय असत्याचं ढळढळीत उदाहरण म्हणजे अवास्तव स्तुती करणे, नसलेले गुण चिकटविणे, किंवा फाजील स्तुती करणे. हे ऐकणाऱ्या सर्वांना

’अनइझी’ करणारं असतं.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील ज्यांनी लढाऊ नेतृत्व महाराष्ट्राला दिलं त्यात ‘दै. मराठा’चे संपादक आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचं नाव अग्रभागी होतं. त्यांचा एक वाक्प्रचार प्रसिध्द होता. ’गेल्या दहा हजार वर्षात अशी घटना/व्यक्ती झाली नाही’ अतिशयोक्तीतून घटना व व्यक्तीचं महत्त्व लोकांच्या लक्षात आणून देण्याची त्यांची ती एक शैली होती. बॅ. विठ्ठल नरहर गाडगीळ यांनी अत्र्यांच्या एका सभेत ’अत्रे खूप चांगलं बोलतात व लिहितात, पण अतिशयोक्ती फार करतात’ असं म्हटलं. नंतर अत्रे म्हणाले ’केंद्रीय मंत्री न.वि . गाडगीळ यांचे चिरंजीव बॅ. विठ्ठल गाडगीळ...’ आणि बॅ. विठ्ठल गाडगीळ यांच्याकडे पाहून ते मिस्कीलपणे म्हणाले ‘ही अतिशयोक्ती नाही ना...’ आणि सभागृह हशा व टाळ्यात बुडून गेले हे सांगायला नको. अत्र्यांसारख्या अफाट कर्तृत्वाच्या माणसाला अतिशयोक्ती शोभून दिसेलही; पण बोलण्यातील अतिशयोक्ती असो की व्यक्ती व घटनेत जे आहे त्यापेक्षा त्याला कमी लेखणं (अंडरइस्टिमेशन) असो, दोन्ही अनुचित समजायला हवीत.

प्रिय बोलण्याने सर्वच खूष होतात. म्हणून तसे बोलण्यात दरिद्रता नसावी (वचने किम दरिद्रता?) असेही गोड बोलण्याचं एक समर्थन केलं जातं. परंतु ते सत्य व पथ्य दोन्ही सांभाळणारं असेलच असं नाही. पण म्हणूनच प्रिय सत्य बोलणं हे कठीण गोष्ट होऊन बसते. अप्रिय असत्य बोलणं हे सोपं आहे, परंतु ते वस्तुस्थितीपासून ते दूर जाणारं आहे, म्हणूनच अस्वीकारार्ह आहे.

गोड खाण्याप्रमाणेच गोड गोड बोलण्याचेही अवेळी अजीर्ण होऊ शकतं. म्हणजे असं की, एखादा खड्ड्यात पडला; तर त्याला ‘व्वा, काय छान पडलात तुम्ही? किंवा ’काय सुंदर जंप मारली तुम्ही’ असं म्हटलं तर (पडलेल्या ) व्यक्तीस रागच येणार. अशा वेळी काहीही न बोलता खड्ड्यातून बाहेर येण्यासाठी त्याला मदतीचा हात दिला तर ते जास्त सयुक्तिक ठरू शकतं. काही वेळा माणसाच्या भावना एवढ्या उचंबळून येतात की, अशा वेळी शब्दापेक्षा स्पर्शाची मूक भाषा अधिक चांगल्या प्रकारे माणसाच्या भावना व्यक्त करते.

शब्दांच्या द्वारे आपण व्यक्त होतो म्हणून माणसाच्या जीवनात शब्दांचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. शब्दांमुळे माणसं जोडली जातात व तोडलीही जातात. शब्दांमुळे मैत्री जुळते व तुटतेदेखील. शब्दांमुळे नाती जुळतात व निखळतात. शब्द प्रेम देतात, शब्द जिव्हाळा जपतात, शब्द जिव्हारी लागतात, शब्द आश्वस्त करतात, शब्द स्फूर्ती व प्रेरणा देतात, शब्द मान वाढवतात व अपशब्द अपमान, मान खंडना करतात. तुम्ही जसा वापर कराल तसे शब्द.

आपण जसे बोलण्यातून व्यक्त होतो तसे न बोलण्यातून म्हणजे अबोला किंवा शब्दांचा वापर न करण्यातूनदेखील व्यक्त होतो. बोलण्याचे जसे सामर्थ्य आहे तसेच मौनाचेही सामर्थ्य आहे; पण आमरण उपोषणासारखं आमरण मौन आपण बाळगू शकत नाही, कारण मानवी व्यवहारच मुळी बोलण्यावर आधारलेला आहे.

सारांश जे बोलायचं ते विचार करून बोलावं हे योग्य. कारण धनुष्यातून निघालेला बाण, शरीरातून निघून जाणारे प्राण आणि तोंडातून निघून जाणारे शब्द परत घेता येत नाही. 'मी अस बोललोच नाही' असं म्हणायला आपण सगळे पुढारी थोडेच आहोत?

◆◆

# फॅशनेबल दुनिया

रंग उडालेल्या (म्हणजे फेडेड) फाटक्या, तुटक्या, तोकड्या, घट्ट, उसवलेल्या, थिगळ लावलेल्या जीन्स आज फॅशनेबल विजार म्हणून मिरविल्या जात असल्या तरी पूर्वी फाटलेली विजार शिंप्याकडून किंवा घरच्या शिवणयंत्रावर शिवून घेण्याची पद्धत आस्तित्त्वात होती! सत्तरच्या दशकात घट्ट विजारीची फॅशन होती. नंतर तिचा बेल बॉटम झाला. या पायघोळ विजारी पायधूळ झाडणाऱ्या होत्या. नंतर मात्र हळू-हळू तंग ते घट्ट अशा दोन अतिरेकी स्टाईल जाऊन विजारी घालणाऱ्याला (व पहाणाऱ्यालाही) कम्फर्टेबल होऊ लागल्या. फॅशन ही सहसा वस्त्रप्रावरणे, आभूषणे, पादत्राणे व अलीकडचा शब्द वापरायचा तर स्त्री-पुरुषांच्या 'ॲक्सेसरीज' (घड्याळ, बॅग्स, पर्सेस, चष्मे) यात दिसून येते. नटण्या मुरडण्याची सगळी साधने यात समाविष्ट होतात. पूर्वी जरा चापून चोपून केशरचना केली जात असत. डोक्यावर चित्र-विचित्र आकाराचं व तेही रंगीत (पंक केलेलं) जंगल हीच एक फॅशन आता होऊन बसली. शाळेतल्या मुलांना तर पूर्वी केस वाढविण्याची परवानगीच नव्हती. बखोट धरून चमन गोटा करण्याला गुरुजी व पालक प्राधान्य देत. पण, तोच (पूर्वीचा) तुळतुळीत चमनगोटा आजही अनेकांची फॅशन आहे.

पूर्वी शिंपी दादाला बऱ्यापैकी व्यवसाय होता. रेडिमेड कपड्यांच्या चलतीने नाही म्हटलं तरी शिंप्यांच महत्त्व कमी झालं आहे. सूट स्पेशालिस्ट मात्र अजूनही आब राखून आहे. वैशाखातील रणरणत्या उन्हात फुल्ल थ्री पीस सूट घालून लग्न करण्याची चाल जोपर्यंत आहे तोपर्यंत सूट स्पेशालिस्टलाही डिमांड रहाणार हे उघड आहे.

स्त्रियांचं फॅशनेबल जग हा एका ग्रंथाचा विषय आहे. रॅम्पवर चालणाऱ्या स्त्रिया इतक्या अवघडलेल्या अवस्थेत का चालतात हे फॅशन डिझायनरच जाणे. आपल्याकडच्या फॅशन संकल्पना या मुख्यत्त्वे वस्त्र केंद्रित (क्लॉथ सेंट्रिक) आहेत. मग तो अभिनेता असो की राजकीय नेता असो. अगदी त्वचेलगत असणाऱ्या टाईट जीन्स किंवा लेगीज यात दोन्ही पाय घालणं व पुन्हा सुखरुप काढणं हे बहुदा द्राविडी प्राणायम करराऱ्यांना सहज शक्य होत असावं. नको त्या जागी पुन्हा फाटू शकते ही एक ॲडीशनल भीती बाळगावी लागते ते वेगळेच. अनेकदा जुन्याच फॅशन्स पुन्हा नव्या म्हणून अवतरतात. एखादया साथीच्या रोगासारख्या फॅशन्स पसरतात. परंतु, फॅशन्स केवळ ड्रेसमध्ये असते असं मानणं बरोबर ठरणार नाही. फॅशन ही खरं तर संकल्पनेत (आयडिया) असते. अनेकदा फॅशनला विरोध करणाराच विशिष्ट फॅशनच्या प्रेमात पडलेला असतो.

सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या सेलेब्रिटीजना स्वत:चं शैली विधान (स्टाईल स्टेटमेंट) असावं असं वाटत. किंबहुना सेल्फ मार्केटिंगच्या आजच्या काळात तुमचा 'लूक' कसा आहे याला महत्त्व आलेलं आहे. पूर्वी हाफ पँटीत मोठा बाप्या माणूस बघितला की हसू यायचं. एवढा मोठ्ठा झाला तरी अजून अर्धी चड्डी घालतो म्हणून. पण, आता अर्धी चड्डीच (कॅप्री) फॅशन झाली आहे.

बदलते ती फॅशन. त्यामुळे बदलणाऱ्या जगात फॅशन ही बदलत रहाणारच. फॅशनला नाव ठेवणं ही देखील फॅशन आहे. फॅशनमधलं आपल्याला जे स्विकारार्ह्र वाटतं ते स्विकारावं व 'दुनिया रंगरंगीली म्हणून न पटणारं सोडून दयावं, दुसरं काय?'

◆◆

# बडे हुए तो क्या हुवा...

शेक्सपीअरचं एक वाक्य आहे 'काही लोक जन्मत: मोठे असतात, काही लोक मोठेपण मिळवितात, तर काहींवर मोठेपण लादलं जातं' (सम आर बॉर्न ग्रेट, सम अचिव्ह ग्रेटनेस ॲण्ड सम हॅव ग्रेटनेस थ्रस्ट अपॉन देम) पण शेवटी 'मोठं' असणं म्हणजे काय? ऐहिक सुखाची भौतिक साधनं, मालमत्ता, सत्ता व संपत्ती म्हणजे मोठेपण की अहंकारविरहित माणूसपण जपणं हे मोठेपणाचं? कबीराने म्हटलय,

बडे हुए तो क्या हुवा जैसे पेड खजूर
पंथी को छाया न मिले फल लागे अति दूर

खजूराच्या झाडासारखं मोठेपण काय कामाचं? पांथस्थाला सावली मिळत नाही व फळही हात पोचणार नाही अशी दूरवर. यापेक्षा कडुनिंब बरा. कडू असला तरी भरगच्च सावली देतो. 'मी' कमावलं 'मी' अमूक केलं, 'मी' तमूक केलं यातील मी पणाचं ओझं मी आणि माझ्या भोवतालचे इतर सगळे यांना जड होणार. कवी बा.भ.बोरकर म्हणतात त्याप्रमाणे 'जीवन त्यांना कळले हो मी पण ज्यांचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो' पण हे 'मी पण' सहजपणाने गळत नाही तर गळू झाल्याप्रमाणे माणसाला चिकटत. जन्मतांना आपण काही आणत नाही आणि मरतांना आपण काही

नेत नाही. हे सगळ्यांना कळतं पण हव्यास सुटत नाही. लहान अर्भकाच्या बंद मुठीतील भाग्य कुणाला माहित नसतं. पण, मरतांना मूठ उघडी असते. हे सगळ्यांना माहित असून देखील 'मी' यंव केलं व 'मी' त्यंव केलं या अहंकाराला अर्थ उरत नाही. वस्तुत: मरणाचं ज्याला भान असतं, त्यालाच जगण्याचही भान असू शकतं. माणसं केवढा अहं बाळगतात. संपूर्ण विश्वाच्या पसाऱ्यात माणूस किती क्षुल्लक व क्षुद्र आहे! पण जगण्याच्या गदारोळात व संघर्षात ब्रह्मांड वगैरे फिलॉसाफी कुठुन सुचणार?

समोरचा माणूस कितीही लहान असला तरी त्याला ज्याचं मोठेपण बोलण्या वागण्यातून खुपत नाही तो खरा (माणूस म्हणून) मोठा. कारण, अहंकारातील क्षुद्रत्त्व त्याने ओळखलेलं असतं. 'साधेपणा, चांगुलपणा व खरेपणा जिथं नसतो तिथं मोठेपणही नसतं' असं लिओ टॉलस्टाय म्हणतात. तसंच कणाकणाने साखर खाणाऱ्या मुंगीचं लहानपण मला दे असं संतश्रेष्ठ तुकाराम म्हणतात. तेव्हा त्यातला भावार्थ खूप मोठा असतो.

लहानपण दे गा देवा मुंगी साखरेचा रवा
ऐरावत रत्न थोर त्यास अंकुशाचा भार
जया अंगी मोठेपण तया यातना कठीण
तुका म्हणे बरवे जाण व्हावे लहानाहून लहान

तुकोबांनी अधोरेखित केललं हे लहानपण म्हणजे अहंकारापासून मुक्ती आणि माणूस म्हणून उन्नत होण्याची युक्ती होय.

◆◆

# जब तक साँस...

जोसेफ ॲडीसन या ब्रिटीश लेखकाने असं म्हटलय, 'आयुष्यात सुखी होण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते. करण्यासारखं काहीतरी काम, दुसरं, ज्यावर प्रेम करावं असं कुणीतरी आणि तिसरं म्हणजे ज्याच्या बद्दल आशा वाटेल असं काहीतरी असलं पाहिजे.'

जगात असा कोण आहे की ज्याने कशाचीच आशा केली नाही. उपवर वधु-वरांना जोडीदार मिळेल अशी आशा असते. विवाहितांना अपत्य प्राप्तीची आशा असते. आई-बाप मुलांविषयी आशा बाळगून असतात. नोकरदाराला बढतीची आशा असते. शेतकऱ्याला पावसाची आशा असते, व्यावसायिकाला चांगल्या व्यवसायाची आशा असते, निवडणूकीतील उमेदवाराला निवडून यायची आशा असते, आमदाराला मंत्री होण्याची, मंत्र्याला मुख्यमंत्री होण्याची, मुख्यमंत्र्याला पंतप्रधान पदाची आशा असते. निर्धनाला धनाची. तर सधनाला आणखी धनाची आशा असते. गृहहीनाला घराची तर बेरोजगाराला रोजगाराची आशा असते. रोग्याला बरं होण्याची आशा असते. माणसाचं सारं जीवन या आशेभोवती घुटमळत असतं.

व्यक्तीच्या जीवनातील घटना व परिस्थिती याबाबत सकारात्मक परीणामावरचा विश्वास म्हणजे आशा. अलीकडे जो उठतो तो या सकारात्मक

दृष्टिकोनावर बोलत असतो. लोकांच्या जवळ जणू सकारात्मक दृष्टिकोन नाही यावर एवढं नकारात्मक बोललं जात की मग लोक कशाच्या आधारावर जगतात असा प्रश्न पडतो. खरं तर आशा ही एखादया स्टेमसेल (जैविक पेशी) सारखी माणसाच्या जन्माबरोबरच निर्माण होते. स्टेमसेल प्रमाणेच ती पुनुरुत्पादीत व नव्याने आकार घेऊ शकते. आशा ही चिवट असते असं म्हणतात. माणसाने शेवटचा श्वास घेईपर्यंत आशा त्याच्या सोबत असते.

जगातील सर्व चांगली कामे आशेच्या बळावर झाली आहे. निराशेला पूर्ण विराम आहे. आशेला नाही. निराशेला मागे सारून पुन्हा नवी आशा निर्माण होते.

'काल' हा इतिहास आहे. 'उद्या' हा अनिश्चित आहे 'आज' हा वर्तमान आहे. आत्ताचा क्षण महत्त्वाचा आहे. तरीही माणूस 'उद्या'वर भिस्त ठेवून असतो. आशा नसेल तर माणसाचं जीवन अंधकारमय होईल. पण, आशा आणि आशाळभूतपणा यात मात्र फरक आहे. आशा ही 'चांगलं काही घडेल' याच्याशी संबंधित आहे. तर आशाळभूतपणा हा आशेबरोबर याचना करणारा आहे.

सगळ्या नकारात्मक गोष्टी हया हताशा किंवा निराशा व्यक्त करणाऱ्या असतात. माणसाच्या जीवनातील नन्नाचा पाढा म्हणजे निराशा. त्या कुणाला हव्यात? त्या कुणालाच नको असतात म्हणूनच माणूस सकारात्मक आशेकडे झुकतो. आशाही जीवन है. सकारात्मक दृष्टिकोन वगैरे नॉर्मल माणसाला शिकविण्याची गरज आहे असं वाटत नाही.

शहेनशाह कोण? ज्याच्याजवळ सगळं आहे व आणखी हवं आहे तो. पण, महात्मा कबीराने खरा शहेनशाह कोण? या प्रश्नाचं उत्तर खूप शतकापूर्वी देऊन ठेवलं आहे. त्यांनी म्हटलंय,

चाह मिटी, चिंता मिटी, मन बेपरवाह
जिसको कुछ नहीं चाहिए वह शहनशाह

पण, निर्मोही व फकीर माणूसही कशाचीच आशा करीत नाही हे खरे कशावरून?

◆◆

# अपने घर का बिस्तर...

गेल्या काही वर्षात पर्यटन वा व्यवसायाच्या निमित्ताने भारतातच नव्हे तर जगभर फिरणाऱ्या भारतीय लोकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

साठ–सत्तरच्या दशकात परदेशात प्रवास करणे ही स्वप्नवत गोष्ट होती. 'फॉरिन रिटर्न्ड' म्हणजे काहीतरी विलक्षण कुतूहलजनक घटना होती. देशात परकीय चलनाची चणचण होती. परकीय चलनावर खूप निर्बंध होते. १९९१ नंतर मात्र परिस्थिती झपाट्याने बदलली. परदेश पर्यटन सुलभ झाले. इंटरनेटने पर्यटनातही क्रांती केली. हॉटेल्स व ट्रेनचे आरक्षण घरबसल्या होऊ लागले. हवाई प्रवासही आटोक्यात आला. जागतिकीकरणामुळे परदेशातील नोकऱ्या व शिक्षणाची कवाडे उघडी झाली. मध्यमवर्गीयांची मुले कर्ज घेऊन का होईना, शिक्षणासाठी परदेशी विद्यापीठात जाऊ लागली. नोकरी करून अनेक तिथे स्थिरावलेही. अनेक भारतीयांची तिसरी पिढी अमेरिकन, ब्रिटिश वा युरोपियन आहे. वृध्द आई–वडिलांनी बहुधा फक्त भूगोलाच्या पुस्तकात किंवा टीव्हीवर पाहिलेले ते अद्भुत देश त्यांना आता मुलांमुळे प्रत्यक्ष अनुभवता येत आहेत.

आजच्या भारतीय तरुणांवर इतिहासाचे दडपण किंवा ओझं नाही. त्याची

दृष्टीही व्यापक व गुणवत्तेला चीअर अप करणारी आहे. जुनीच धोपटणी घेऊन भारताचे राजकारण किंवा समाजकारण कुणी करू पाहिलं तर त्याला देशाची तरुणाई या पुढे भीक घालेल, असे वाटत नाही.

इथली कौटुंबिक आस्था, परंपरेतील सुंदर प्रतिकात्मकता आणि त्यातून संस्कार दृढ करणारी व्यवस्था आणि अत्याधुनिक जगातून निर्माण होणारा जगण्याचा सुपरफास्ट वेग यातून जी सांस्कृतिक व सामाजिक घुसळण होत आहे त्यामुळे मध्यमवर्गीय मानसिकतेला हादरे बसणे स्वाभाविक आहे. तरुण पिढी तशी 'कूल' आहे. रोजचे जगणे हाच संघर्ष असलेला वंचितांचा वर्ग व कशाचीच वंचना नसलेला स्वमग्न असा अत्युच्च उत्पन्न गटही देशात अस्तित्वात आहे. या सर्वांना एका सूत्रात बांधू शकेल, असा समाजाची धारणा करतो तो धर्म (धारयति स धर्मः) या अर्थाने या देशाचा राष्ट्रधर्म कोणता? (जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा हा जसा जपान किंवा इस्त्राएलचा आहे.) 'हा माझा देश आहे. मी या देशाचा आहे,' ही समान भावना कशी निर्माण होणार? हे प्रेरणा स्त्रोत तरुण पिढीला कुठून मिळणार? या देशाचे नेतृत्व कसे असेल यावर या प्रश्नांची उत्तरे अवलंबून आहेत.

परदेशात आपण कितीही भटकलो आणि बर्गर व पिझ्झा यांचे कितीही प्रकार खाल्ले तरी इथली कांदा भजी, बटाटेवडा, मिसळ व इडली सांबार (आणि वर चहाचा कट) तिथे अस्वस्थ करतोच. आता हे सगळे तिथेही रेडिमेड मिळते म्हणा; पण गणेशचतुर्थी व दिवाळीचा माहोल तिथे (परदेशात) कसा निर्माण होईल? गल्लीबोळातून येणारे तळणाचे खमंग वास, अगरबत्ती, धूप दीप, फुले यांचा संमिश्र सुवास व निरनिराळ्या ऋतूंशी आपल्या सणांचे जोडलेले नाते ही फक्त हिंदुस्थानातच अनुभवायची गोष्ट आहे. त्यामुळे निदा फाजली यांच्या कवितेत म्हटल्याप्रमाणे–

हमने भी सोकर देखा है नये पुराने शहरोमें
जैसा भी है अपने घर का बिस्तर अच्छा लगता है...

◆◆

# रंग राजकारणाचे...

निकिता क्रुश्चेव्ह या रशियन नेत्याच्या मते 'सर्व ठिकाणचे राजकारणी सारखेच असतात. नदी जरी अस्तित्वात नसली तरी त्यावर पूल बांधण्याचे आश्वासन ते देऊ शकतात.' (पॉलिटिशियन आर द सेम ऑल ओव्हर. दे प्रॉमिस टू बिल्ड ब्रिजेस इव्हन व्हेन देअर आर नो रिव्हर्स.) सर्व पक्षांचे जाहिरनामे बघितले तर ही गोष्ट अर्थातच लगेच लक्षात येते. निवडणूक संपल्यानंतर राजकीय नेते व सर्वसामान्य जनता या दोहोंना जाहिरनाम्यातील आश्वासनांचा विसर पडतो.

राजकीय व्यक्ती व एकूणच निवडणुका यांच्या कार्यपध्दती (स्टाईल ऑफ फंक्शनिंग) मध्ये मात्र कमालीचे बदल झालेले आहे. पूर्वी उत्कृष्ट वक्त्यांची उत्तमोत्तम भाषणे ही मोठी मेजवानी असायची. कॉम्रेड डांगे यांचा नर्मविनोद, रामभाऊ म्हाळगी, मृणाल गोरे यांची तर्कशुध्द व विधायक टीका, नानासाहेब गोरे, आचार्य अत्रे, बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांची खुसखुशीत भाषणे, दादासाहेब गायकवाड, एस.एम.जोशी यांची संयमी व सौजन्यपूर्ण भाषणे, बापूसाहेब काळदात्यांची घणाघाती टीका, बाळासाहेब ठाकरे यांचा श्रोत्यांशी थेट संवाद असा निवडणुकांचा माहोल असायचा. समाज शिक्षकाची व लोकप्रबोधनाची भूमिका हे सर्वजण सहजपणे निभावून नेत. मराठी भाषेवर या व्यक्तींचे

प्रभुत्त्व होते. अलीकडे चांगली मराठी भाषादेखील ऐकायला मिळत नाही.

सर्व प्रभावी नेत्यांचे (जागतिक किंवा राष्ट्रीय) एक समान वैशिष्ट्य म्हणजे या लोकांनी भाषेवर भरपूर मेहनत घेतलेली असते. सध्याच्या काळात मोठे नेते हे 'स्क्रिप्ट रायटर' बाळगतात. अर्थात साहित्य व भाषेचा उत्तम अभ्यास असणारे अटलबिहारी वाजपेयी किंवा बॅ. नाथ पैंसारखे नेते श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत. साधेपणा, मूल्यांवरील श्रध्दा, सौजन्य, जनहिताची मनापासून कळकळ, अन्यायाची चीड, अशी काही समान वैशिष्ट्ये या राजकीय नेत्यांजवळ होती. त्यामुळे क्रिमिनल प्रवृत्ती राजकारणापासून सहसा दूर राहत असे. राजकारणात सत्प्रवृत्त व चांगल्या लोकांनी यायला हवे, असे (फक्त) म्हटले जाते; पण ब्रिटिश अर्थतज्ज्ञ ग्रॅशम यांचा 'ग्रॅशम्स लॉ' नावाचा एक नियम आहे. पैशाच्या चलनाच्या बाबतीत 'वाईट पैसा चांगल्या पैशाला हुसकावून लावतो.' (बॅड मनी ड्राईव्हज् अवे गुड) अगदी सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, आपण आधी फाटक्या, मळक्या नोटा बाजारात खपवतो. चांगल्या कोऱ्या, करकरीत स्वत:जवळ ठेवतो. हलक्या धातूची (निकेल, अॅल्युमिनियम, स्टील) आणि सोने, चांदी इत्यादी किमती धातूंच्या नाण्यांची दर्शनी किंमत (फेस व्हल्यू) सारखी असली तर बाजारात हलक्या धातूंच्या नाण्यांचा सुळसुळाट होतो. हल्लीच्या राजकारणालाही ग्रॅशमचा नियम लागू पडतो. सोशल नेटवर्किंग, विविध चॅनेल्स, व्हॉटस् अॅप, मोबाईल्स इ.च्या माध्यमातून सध्याचे राजकारण हे हायटेक झालेले आहे खरे. जवळपास प्रत्येक घरात टीव्हीसेट व मोबाईल फोन आहेत. सर्वसामान्य भारतीय हा माहितीने समृध्द आहे. दृश्य माध्यमांमुळे निरक्षरालाही माहिती मिळते. त्यामुळे कंठाळी घोषणाबाजी, रॅलिज इ.ला सामान्य मतदारांच्या दृष्टीने महत्त्व उरलेले नाही. रॅलिजच्या शक्ती प्रदर्शनातील 'अंदरकी बात' सगळ्यांना माहीत असते. 'आम्ही मतदान केले आहे. हे राष्ट्र (किंवा राज्य) तुम्ही सांभाळा. आम्हाला सुखाने जगू द्या,' यापेक्षा सामान्य माणसाचे मागणे 'लई' नसते. सामान्य राजकारणी पुढच्या निवडणुकीचा विचार करतो, तर धोरणात्मक विचार करणारा द्रष्टा नेता पुढील पिढ्यांचा विचार करतो. असे काही नेते या देशाला लाभले तर देश सुखी व समृध्द होऊ शकेल.

◆◆

# घर घर की कहानी

माणसाच्या आयुष्यातील त्याच्या मनात घर करून रहाणारी कुठली कल्पना असेल तर 'घर' हीच आहे. अगदी पशु-पक्षी ही निवारा निर्माण करतात. मनुष्यप्राण्याची घर ही तर मूलभूत गरज आहे. झोपडी असो की महाल माणसाला हक्काचा निवारा हवा असतो. मुंबई सारख्या महानगरातील निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या स्लम मधून रहाते. सर्वसोयींनीयुक्त घर मिळविण्याचं अनेकांचं स्वप्न हे स्वप्नच राहून जातं.

घरासाठी (अर्थात स्वकष्टार्जित) माणसाला केवढी धडपड करावी लागते. सामान्य माणसाला घरासाठी कर्ज काढण्यासाठी दुसरा उपाय नसतो. घराचा हप्ता देऊन उरलेल्या पैशात कुटुंबाची उपजिविका करतांना त्याला तारेवरची कसरत करावी लागते. अनेक इच्छा माराव्या लागतात. घराची निवड जरी केली तरी घर खरेदी लगेच होतेच असं नाही. मात्र घरातील भावनिक गुंतवणूक वाढत जाते. घराचा सौदा मोडला किंवा मनातील घर विकत घेता आलं नाही तर भावनिक उलथापालथही सहन करावी लागते.

'मूर्ख लोक घर बांधतात व शहाणी माणसं त्यात रहातात' (फूल्स बिल्ड हाऊसेस ॲण्ड वाईज मेन लिव्ह इन देम) अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. छानसं मनाजोगत घर बांधून इतरांना ते रहायला देणं हा

मूर्खपणा हे सुचविणारी ही म्हण आहे. म्हणजेच घर स्वत:साठी बांधावं व त्यात स्वत: रहावं हे शहाणपणाचं लक्षण असा याचा अर्थ आहे. भाड्याचं घर हे शेवटी भाड्याचं घर असत. भाडेकरू व घरमालक यात मालकी हक्काची मोठीच भिंत आहे. स्वत:च घर हे शेवटी स्वत:चं घर असतं.

घराची नावं बघितली तर घर बांधणाऱ्याची त्या संबंधीची मनोभूमिकाही समजते 'साफल्य', 'स्वप्न' यातून घर बांधल्याने आयुष्यातील मोठी स्वप्नपूर्ती झाली असं दिसतं. 'पितृछाया' किंवा 'मातृछाया' हे असच एक कॉमन नाव. अशा नावांच्या घरातून जर माता-पिता खरच सुखी असतील तर ठीक. माझ्या एका मित्राने घराचं नाव 'पितृऋण' ठेवलं. वडिलांकडून कर्ज घेऊन घर बांधलं म्हणून. तर दुसऱ्या एका मित्राने आयुष्यभर त्याला जे शिकवावं लागलं ते नाव त्याच्या बंगल्याला दिलं. 'सिद्धांत' हे नाव त्याने बंगल्याला दिलं.

पण, सुंदर घर म्हणजे नेमकं कोणतं घर? केवळ सुरेख रंगसंगती, महागड फर्निचर, शोभिवंत शोपिसेस व होम स्वीट होम लिहिलेलं घर म्हणजे सुंदर घर नव्हे. जिथं रहाणाऱ्या माणसांमधे स्नेह, विश्वास, पारदर्शिता, अगत्य, आस्था व संवेदनशीलता आहे असं घर म्हणजे सुंदर घर. ते कदाचित शेणाने सारवलेलं व कुडाच्या भिंतीचही असू शकतं. म्हणजे अवकाशात चार भिंती उभारून जी जागा घर म्हणून निर्माण केली जाते. तिथे माणूस व त्याचं वर्तन हेच सुंदर घराचे निकष आहेत. असमाधान, भांडणं, द्वेष, कटुता जिथं आहेत ते कसलं सुंदर घर? शेवटी सुरक्षितता देणारी घर ही भौतिक गरज आहे. घरातील माणसं महत्त्वाची असतात.

सौंदर्यासक्त, उत्तम अभिरूची असणारी, पुस्तकांना थोडी जागा देणारी (व किंचित अस्ताव्यस्त) सुवासाचा परिमळ असणारी घर आवडून जातात. घरात राहणाऱ्या व्यक्तीप्रमाणे घरालाही व्यक्तिमत्त्व निर्माण होत की काय जाणे. म्हणजे स्वागतशील, प्रसन्न, तुसडी, दर्प, दंभ असलेली घर ही ओळखता येतात. म्हणून घर कसं असावं हे घरापेक्षा घरातील व्यक्तींवर जास्त अवलंबून असते हे निश्चित.

◆◆

# कुठे गेलेत ते लोक...

माझ्या गावी मोहमंद दादा नावाचे एक सद्‌गृहस्थ होते. सर्व समाजात त्यांच्या सद्‌वर्तनामुळे त्यांना मान होता. भूमिका नेहमी समन्वयाची. ते रस्त्याने जात असतांना दोन लहान मुले भांडतांना दिसली तर ते थांबत. त्यांची समजूत काढून त्यांचं भांडण मिटवित. त्यांना काहीतरी मजेदार बोलून हसवत. ती मुलं हसत-हसत निघून गेली की ते समाधानाने मार्गस्थ होत. आताचे सर्व थरावरचे दंगेधोपे, भांडण पाहिली तर वाटतं सौहार्द जपणारी ती माणसं कुठं गेली?

मध्यंतरी टिटवाळा-कल्याणच्या दरम्यान लाकल रूळावरून घसरून अपघात झाला. पंधरा-सोळा वर्षाचा एक कोवळा मुलगा रक्तात तडपडत असतांना अनेक बघे त्याचा फोटो काढीत होते. वेळेवर त्याला हॉस्पिटलमध्ये पोहचविण्यास कुणी मदत केली असती तर कदाचित त्याचा जीव वाचला असता. दुसऱ्याच्या दु:खात धावून जाणारी संवेदनशील माणसं कुठं हरवली? अपवादात्मक कुणी निरपेक्षपणे मदत करतातही. पण, तो अपवादच.

पूर्वी लग्न, सण, जाऊळ इ.समारंभ म्हणजे चांगला तीन-चार दिवसाचा कार्यक्रम असायचा. नातेवाईकांचा गोतावळा व मित्र परिवार यांच्या आधारावरच लग्न समारंभ साजरे व्हायचे. लग्नाच्या जेवणाच्या पंक्तीला वाढायला नातेवाईक

व मित्रच मदत करीत. काका, मामा, मावश्या, आत्या, भाऊ–बहिण सर्व मदतीला चार दिवस आधी येत. रुसवे–फुगवे, मान–पान हे सर्व असे पण, जिव्हाळ्याच्या अतूट धाग्याने सर्वजण बांधलेले असत. जिव्हाळा जपणारे ते धागे आता विसविशीत झालेले आहेत असं दिसतं. लग्न हा एक 'इव्हेंट' झाला आहे. पूर्वीपेक्षा अधिक सुविधाही निर्माण झालेल्या आहेत. लग्न समारंभ हे अधिक 'ग्लॅमरस' झालेले आहेत. पण, तरीही यात काहीतरी 'मिसिंग' आहे असं वाटत राहतं.

आज व्यवसाय / नोकरीच्या निमित्ताने दूरगावीच नव्हे तर दूरदेशी जावे लागते. त्यामुळे कुटुंबे दुभंगली. नागरीकरण व जगण्याचे ताण व संघर्षही वाढले. परस्परांवर अवलंबून रहावं लागत असल्यामुळे निर्माण होणारं समाजातील एकजिनसीत्त्व दुभंगलं. संवेदनशीलता, माणुसकी, भूतदया, परस्परांना निरपेक्ष मदत इत्यादी मूल्ये शिकविण्याची पूर्वी आवश्यकता नव्हती. 'मी, माझं, मला' यापेक्षा 'आम्ही, आमचं, आम्हाला' ही भावना प्रबळ होती.

समाजातून संवेदनशीलता पूर्णपणे हरवली असा याचा अर्थ नव्हे. माणूस म्हटल्यावर त्याच्यात संवेदना या असणारच. एखादया असाध्य रोगाशी सामना करणाऱ्या मुलाच्या मदतीसाठी किंवा पराकोटीच्या विपरीत परिस्थितीतही जिद्दीने शिकणाऱ्या मुलांसाठी आजही उदारहस्ते समाज मदत करतो हे दिसतेच. अपघात प्रसंगी बघ्याची भूमिका न घेता मदत करणारेही आहेतच. या मूल्यांची जपणूक करणारा समुदाय वाढला तर पूर्वीचे ते लोक कुठे गेलेत अशी हळहळ व्यक्त करण्याची गरज उरणार नाही. सत्प्रवृत्त व माणुसकी हा धर्म मानणाऱ्यांचा समुदाय जितका वाढेल तेवढ्या प्रमाणात समाजातील वंचित, दु:खित व पिडीतांचा दु:ख भार कमी होईल. अशा समाजाच्या निर्मितीसाठी कोण प्रयत्न करील?

◆◆

# माया मरी न मन मरा...

अर्थशास्त्र हे काही केवळ पैशांचे शास्त्र नव्हे किंवा पैसा कसा मिळवावा हे सांगणारेही शास्त्र नव्हे. अर्थशास्त्राची ओळख करून देताना 'जगातील सगळे लोक काम का करतात? (स्वेच्छेने आळशी रहाणारे सोडून द्या.) का एवढी धावपळ करतात? का एवढं राब राब राबतात? असे प्रश्न मी माझ्या विद्यार्थ्यांना विचारित असे. मुलाकडून याचं उत्तर बहुदा एकमुखाने 'पैशासाठी' असं यायचं. यावर त्यांना मी आणखी एक कल्पना करायला सांगत असे. 'समजा नोटांनी गच्च भरलेली असंख्य पोती तुमच्याजवळ आहेत. (कल्पना करायला काय हरकत आहे.'वचने किम दरिद्रता') आणि जिथं कुठलीही वस्तू खरेदी करता येत नाही अशा खडकाळ, निर्जन एकाकी बेटावर तुम्हाला पाठवलं व सांगितलं की आता सुखात व मजेत रहा तर तुम्ही सुखी व्हाल? एका सूरात उत्तर 'नाही' असं यायचं. म्हणजेच माणसाच्या निरनिराळ्या (व पुन्हा पुन्हा उद्‌भवणाऱ्यादेखील) असंख्य गरजा भागविणाऱ्या वस्तू व सेवा हे त्याचं साध्य किंवा उद्दिष्ट आणि पैसा हे ते मिळविण्याचं केवळ साधन मात्र आहे. अल्लाउद्दिनच्या त्या 'मॅजिक लॅम्पसारखा' हवे ते देणारा जादूचा दिवा जर प्रत्येकाला मिळाला असता तर पैसे मिळविण्याची एवढी धडपड कुणी कशाला केली असती? अर्थात

माणसाची प्रगतीही झाली नसती कारण गरज ही शोधाची म्हणजेच प्रगतीचीही जननी आहे. अर्थशास्त्र माणसाच्या आर्थिक वागणुकीचा विचार करतं.

थोडक्यात अर्थशास्त्रात 'अर्थ' असला तरी पैशाला अर्थशास्त्रात मर्यादित महत्त्व आहे. केवळ पैसा हेच ज्याच्या जीवनाचं शास्त्र आहे तिथं अनर्थशास्त्र निर्माण होऊ शकतं. म्हणून पैसा हे माणसाच्या सुखाचं अंतिम उद्दिष्ट असू शकत नाही. पैसा असून, सुख किंवा समाधान नसतं. कारण तिथं पैशालाच सुख मानलं जातं. सुखाचं हे त्रांगडं किंवा भिजत घोंगडं त्यामुळेच काहींना आयुष्यभर वागवावं लागतं. पैशाची हाव किंवा लोभ माणसाला सुखी करू शकत नाही. 'ही धरती माणसाच्या गरजेपुरतं सगळं देऊ शकते पण त्याच्या लोभाला मात्र ती पुरू शकत नाही' हे महात्मा गांधींचं वाक्य माणसाची हाव अधोरेखित करणारं आहे. पैसा असूनही लोभी असलेली माणसं खरं तर भिकारीच म्हणायला हवी. पैसे डबल करून देण्याच्या करामतींना व आमिषाला भुलणारी, फसणारी आणि नंतर पस्तावणारी माणसं आपण असंख्य वेळा बघतो. पैसे डबल करण्याचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे नोटेची डबल घडी करून खिशात ठेवणे हा होय! पैसा असणं व त्यातून काही गोष्टी विकत घेता येणं हे व इथपर्यंतच ठीक आहे पण पैशाने ज्या गोष्टी विकत घेता येत नाहीत, याचाही विचार आपण अधूनमधून करायला हवा. प्रेम, झोप, आनंद, समाधान व जीवन पैशाने विकत घेता येत नाही. माणसाची तृष्णा व मोह हे अपार असतात. माणसाला पैसा खेळविता आला पाहिजे, पण अनेकदा पैसाच माणसाला खेळवितो. मृत्यूच्या दारातही पैशाचा लोभ काहींना सुटत नाही. कबीर म्हणतात,

माया मरी न मन मरा, मर मर गए शरीर
आशा, तृष्णा न मरी, कह गए दास कबीर

◆◆

# तोल मोल के बोल

चांगला विक्रेता कोण? जो उत्तर ध्रुवावर राहणाऱ्या एस्किमो लोकांना फ्रीजची खरेदी करण्यास प्रवृत्त करेल तो. बाजारात अक्षरश: हजारो नवीन वस्तू दररोज अवतरत असतात. खऱ्या-खोट्या गरजा निर्माणही केल्या जातात. मग वस्तूची जाहिरात करणे आले. बक्षिसे, एकावर एक फुकट अशी आमिषे आली. 'वरलिया रंगा' भुलू नये हे खरे असले तरी वरलिया रंगावर भुलूनच खरेदीही होते. विक्रीसाठी केला जाणारा सर्व खर्च ग्राहकाच्या नकळत त्याच्या खिशातूनच केला जात असतो.

वस्तू उत्पादन करणाऱ्या सर्व कंपन्यांना त्यांचा मार्केटिंगचा ग्राफ सतत उंच व चढा ठेवायचा असतो. त्यामुळे मार्केटिंग ऑफिसरचा जॉब जितका आव्हानात्मक तितकाच कटकटीचा व टेन्शनचाही असतो. रेसच्या बाजारातील घोडे सतत पळत राहिले पाहिजे; पण मार्केटिंगच्या या वरच्या फळीतील लोकांपेक्षा किरकोळ विक्रेत्याचा सर्वसामान्य ग्राहकाशी संबंध येतो. मार्केटिगच्या साखळीतील हा महत्त्वाचा दुवा असतो. हजार प्रकारचे ग्राहक व त्यांच्या हजारो आवडी-निवडी. या प्रत्येकाशी 'डील' करणे कठीण काम नाही, असे कोण म्हणेल?

उर्मट, उध्दट व चमत्कारिक विक्रेत्यांकडे कुठला ग्राहक जाईल? त्यामुळे

विक्रेत्याच्या तोंडात साखर व डोक्यावर बर्फ असला पाहिजे, असे म्हटले जाते विशेषत: बायकांची खरेदी असेल, तर त्या फटकन 'काय घाणरडे कॉम्बिनेशन आहे या साडीचे' किंवा 'मागच्या वेळी आम्ही इथूनच साडी खरेदी केली. एका धुण्यात पोतेरे झाले तिचे,' असे विक्रेत्यांच्या तोंडावर त्या बोलू शकतात. अशा वेळी शांत राहणारा विक्रेता 'स्थितप्रज्ञ'ही असावा लागतो. पुरुषांची खरेदी त्या मानाने झटपट आटोपणारी असते. सणासुदीच्या दिवसात खिशाला भगदाड पडल्यामुळे नवऱ्यांचे चिंतातूर झालेले चेहरे आणि 'काय छान खरेदी झाली.' या आनंदात असलेल्या बायका हे मार्केटमधील सार्वत्रिक दृश्य असत.

खरेदीचा आनंद खरोखरच निराळाच असतो. इतरांपेक्षा ती वस्तू आपल्याला किती स्वस्त मिळाली यातही अनेकदा हा आनंद लपलेला असतो. लकी ड्रॉ किंवा अशाच एखाद्या स्किममध्ये फुकटात मिळालेल्या वस्तूचा आनंद अर्थातच सर्वाधिक असतो; पण खरेदी जेव्हा केव्हा खऱ्याखुऱ्या चॅरिटीशी जोडली जाते तेव्हा अशी खरेदी आत्मिक समाधानही देते.

भारतात मॉल आलेत अन् खरेदीच्या सगळ्या संकल्पनाच बदलून गेल्या. 'जा, बघा, पहा, हाताळा, निवडा व खरेदी करा.' या प्रकारच्या खरेदीमुळे वाणीदादाशी असलेल्या व अडीअडचणीत सांभाळून घेणाऱ्या एका आत्मीय संबंधाचा अध्याय हळूहळू संपुष्टात येत आहे. आता ऑनलाईन शॉपिंगही मोठ्या प्रमाणात सुरू झालेले आहे.

भारतातच नव्हे तर जगभर सर्वत्र 'रस्ते का माल सस्तेमे' हे दिसून येते; पण 'महँगा रोए एक बार सस्ता रोए बारबार' हेही याबाबत खरेच आहे. रस्त्यावरच्या विक्रेत्याला मालाच्या गॅरंटीबद्दल विचारले तर तो म्हणतो, 'भाईसाब माणसाची गॅरंटी नाही तर वस्तूची कसली मागता?' रस्तावरचा 'हिसाब' हा असा चोख नसला तरी रोखठोक असतो. 'डुप्लीकेट' व 'पायरेटेड' वस्तूंचे जगही प्रचंड आहे. क्रयशक्ती कमी असलेल्या समाजात याचीही गरज निर्माण होते.

माणसाच्या गरजा अनंत व न संपणाऱ्या आहेत. नवीन गरजा व नवीन वस्तू हे चक्र अव्याहत चालूच राहते. या शतकाच्या सुरुवातीला फोन भारतात दुर्मिळ होता. आता मोबाईल फोनचं अक्षरश: अक्राळविक्राळ मार्केट आहे.

आशावादी माणूस म्हणतो, ‘अर्धा प्याला भरलेला आहे.’ निराशावादी व्यक्ती म्हणते, ‘अर्धा प्याला रिकामा आहे.’ यात ज्याला मार्केट ‘दिसतं’ तो म्हणतो, ‘तुमच्या प्याल्याचा आकार बदलला पाहिजे.

◆◆

# सारे जहाँसे अच्छा...

२६ जानेवारी रोजी आपण प्रजासत्ताक दिवस साजरा करतो. तसे आपण भारतीय अनेक प्रकारचे दिवस व उत्सव साजरे करतो. परंतु, प्रजासत्ताक दिनाचं महत्त्व विशेष आहे. भारत या सार्वभौम राष्ट्राचे आपण संविधानपूर्वक नागरीक झालो. स्वतंत्र भारतातील आपल्या जगण्याचा आधार भारतीय संविधान आहे. ७५० वर्षे मुस्लिम राजवट व १५० वर्षे ब्रिटिशांच्या जोखडाखाली राहिलेला आपल्या देशातील लोकांना स्वतंत्र, सार्वभौम, प्रजेची सत्ता असलेलां राष्ट्र मिळालं. पण, हे हक्क आपल्याला टप्पकन हातात पडणाऱ्या फळासारखं मिळालेल नाही. हजारो हुतात्म्यांच्या बलिदानातून आणि स्वार्थत्यागातून स्वातंत्र्याची ही इमारत उभी राहिली आहे.

१९५० मध्ये आपल्या देशाची लोकसंख्या ३६ कोटी होती. बहुसंख्य समाज निरक्षर होता, उत्पन्न, उत्पादन व रोजगाराची अत्यल्प साधने होती. दारिद्र्याचे प्रमाण प्रचंड होते. तरीही देशाला अत्यंत प्रगल्भ, विद्वान, महापंडीत व नि:स्वार्थी नेत्यांचे नेतृत्त्व मिळाले हे देशाचं केवढं भाग्य! समाजकारण, राजकारण आणि त्यागमय जीवन यांचा मिलाफ असलेल्या नेतृत्त्वाचं जणू अमाप पीकच स्वातंत्र्यपूर्व काळात आले. स्वातंत्र्यासारखी संदिग्ध व अदृश्य संकल्पना सामान्यांच्या अंत:करणापर्यंत नेणारा गांधीजीसारखा अलौकिक नेता

या देशाला लाभला. हसत–हसत स्वातंत्र्यासाठी फासावर जाणाऱ्या तरुणांनी या देशासाठी सहज बलिदान केलं. शिरीषकुमार सारख्या कित्येक कोवळ्या मुलांची स्वातंत्र्याच्या या होमात आहुती पडली. प्रजासत्ताक दिवस या सगळ्यांचं स्मरण करण्याचा, त्यांना मानवंदना देण्याचा दिवस आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावरही देशाच्या स्वातंत्र्यावर आक्रमणे झाली. यात देशासाठी शहीद झालेल्या हजारो सैनिकांच्या बलिदानाची आठवण ठेवण्याचा हा दिवस आहे.

भारत हा जगातील सर्वाधिक तरुणांचा देश आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या या चौथ्या पिढीला प्रजासत्ताकचा व स्वातंत्र्याचा इतिहास माहित असलाच पाहिजे. जे इतिहास विसरतात त्यांना इतिहास कधीच क्षमा करीत नाही असा इतिहास आहे.

१९५० नंतर आपण खरं तर अनेक क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली आहे. मग ते तंत्रज्ञान असेल किंवा अन्नधान्यांचं उत्पादन असेल. मी फ्रान्स व इतर युरोपीय समुदायात असतांना मला तेथील तरुणांकडून एक प्रश्न हमखास विचारला जायचा. 'व्हाट इम्प्रेसेस यू मोस्ट इन आवर कंट्री?', 'आमच्या देशातील कुठली गोष्ट तुम्हाला सर्वाधिक प्रभावित करते?' मी उत्तर द्यायचो, 'तुमच्या तंत्रज्ञानात्मक गोष्टींनी मी प्रभावित होत नाही. ती क्षमता आमच्या देशातही आहे. मला तुमच्या व्यवस्थांच आकर्षण आहे, ज्या खूप कार्यक्षमतेने चालतात. मग ते शिक्षण असो, वाहतूक असो, कायदा, सुव्यवस्था असो.' मला असं वाटतं की केवळ संविधानात संस्थात्मक तरतुदी असणं आणि प्रत्यक्षात त्या नागरीकांच्या जीवनात उतरणं याला प्रासकीय कौशल्याबरोबरच नेतृत्त्वाची 'क्वलिटी' उत्कृष्ट असणं आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात नेतृत्त्वाची गुणवत्ता व सार्वजनिक मूल्ये यांचा झपाट्याने ऱ्हास होत गेला. गुणवंत व जबाबदार नेतृत्त्वाची फळी निर्माण करण्यास आपण सपशेल अपयशी ठरलो. 'राजा कालस्य कारणम' असे म्हणतात किंवा 'यथा राजा तथा प्रजा'. परंतु, 'पिपल गेट दि गव्हर्नमेंट दे डिझर्व्ह' असही म्हटलं जात. या देशातील तरुण वर्ग हा या देशाचं एका बलशाली, सामर्थ्यवान व संपन्न देशात रुपांतर करु शकतो. स्वातंत्र्यानेच त्यांना ही संधी बहाल केली आहे. त्याचा उपयोग ते कसा करतात यावर देशाची गती व प्रगती अवलंबून आहे.

देशाने काही बाबतीत प्रगती केली तरी आजही देशातील ३० कोटी लोक हे अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या मूलभूत गोष्टींपासून वंचित आहे. देशातील हुतात्म्यांना वंदन करीत असतांनाच या वंचितांसाठी 'भारतीय म्हणून मी काहीतरी निश्चित करेन' असा निश्चय करण्यासाठी हा दिवस आहे. कारण, 'हा देश सर्वार्थाने सुखी झाला तरच मी सुखी होईन' ही भावना प्रत्येकाच्या मनात असली पाहीजे. स्वातंत्र्याला लायक होण्याचा प्रयत्न केला तरच स्वातंत्र्याला काही अर्थ आहे. स्वातंत्र्याबरोबर प्रखर राष्ट्रीयत्त्व व शिस्तही अंगीकारावी लागते. या देशातील वंचितांना जोपर्यंत आर्थिक व सामाजिक न्याय मिळत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य नांदू शकत नाही. स्वातंत्र्याऐवजी अनिर्बंधता, समतेऐवजी सरंजामशाही आणि बंधुत्वाऐवजी जात्यंधता व धर्मांधता निर्माण होत असल्यास स्वातंत्र्याचा फक्त डोलारा उभा राहील. देश महाशक्ती नव्हे, तर तो सुखी, समृद्ध व संपन्न व्हायला हवा. यासाठी इथल्या व्यवस्था सुधारायला हव्यात. हे आव्हान आपण भविष्यात कसे पेलतो यावरचं इथल्या अनेक भावी पिढ्यांचे भवितव्य अवलंबून आहे.

देशावर मागील अनेक शतकात असंख्य संकटे आली तरी या देशाचं भारतीयत्व या सगळ्या संकटांना पुरून उरलं. परंतु, आपला देश खऱ्या अर्थाने 'सारे जहॉंसे अच्छा' व्हायचा असेल तर प्रामाणिक प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागेल. इक्बालने म्हटले आहे,

युनान औ मिस्त्र औ रोम
सब मिट गये जहॉंसे,
अब तक बाकी है नामों निशां हमारा,
कुछ बात है कि हस्ती मिटती नहीं हमारी,
सदीयों रहा है दुश्मन दौरे जहॉं हमारा,
सारे जहॉंसे अच्छा हिंदोस्ता हमारा.....

◆◆

# देवाचिये द्वारी...

मी मुंबईला ज्या ठिकाणी राहतो तेथे समोर चौरस्ता आहे. चौरस्त्याच्या जाणाऱ्यांची खूप वर्दळ त्या ठिकाणी असत. तेथे गावाकडच्या एखादया काकूपासून ते अगदी हाय–फाय कॉलेज गर्लपर्यंत सर्वजण मंदिरासमोर भक्तीभावाने हात जोडतांना दिसतात. जीन्स व कॅप्री घातलेले तरुण – तरुणींची संख्या लक्षणीय असते. अनेकदा खूप महागड्या कार्स त्या छोट्याश्या मंदिरासमोर उभ्या राहतात. त्यातून उतरणारे भक्तही अत्यंत आदरपूर्वक मंदिरातील देवांसमोर नतमस्तक होतात व पुनश्च कारमधून मार्गस्थ होतात. काय मागत असतील हे लोक देवाजवळ? सगळी यंत्रे निघाली आहेत. माणसाचं मन वाचण्याचं यंत्र काही अद्याप निघालेलं नाही.

मुंबई सारख्या शहरातूनच नव्हे तर छोट्या–मोठ्या शहरातूनही आता असुरक्षितता ही सार्वत्रिक आहे. या असुरक्षिततेतून सध्याची आपली व्यवस्था काही फारसा आशादायक दिलासा देत नाही. यातून देव नावाची अदृश्य शक्ती आपल्याला सोडवील हा आशावाद बहुदा माणसाला देवाच्या दाराजवळ खेचून आणतो की काय? 'देवाचिये द्वारी, उभा क्षणभरी, तेणे मुक्ती चारी साधियेल्या' यासाठी या धावपळीच्या जगात माणूस देवाचियेद्वारी उभा रहात असेल काय?

'मुकं करोती वाचालम्, पंगु लघंयते गिरी' हे माणसाच्या निश्चयाचे बळ की परमेश्वराची कृपा? निश्चयाचे बळ माणसाच्या मनात पेरणारी शक्ती ही परमेश्वराची असही याच उत्तर कुणी देऊ शकेल. आपत्ती, विपदा, नैसर्गिक उत्पात, संकटे, मृत्युची भीषणता अशा माणसाचा निरुपाय असणाऱ्या क्षेत्रात बहुदा 'तुजविण कोण दाखविल वाट' अशी प्रार्थना करणं हेच माणसाच्या हाती उरतं.

अमरनाथ असो की वैष्णोदेवी आपल्या अनेक देव देवता अशा ठिकाणी स्थानापन्न आहेत की भक्ताची शारीरिक व मानसिक कसोटी पाहिल्यावरच दर्शनाचा लाभ होतो. महात्मा कबीर म्हणतात, मला (परमेश्वराला) शोधण्यासाठी कुठेही धावाधाव करण्याची गरज नाही. जिथे श्वास आहे तिथे मी आहे, श्वास थांबला की प्राणीमात्राचं जीवनच संपत.

अनेकदा मंदिराच्या समोरून जाणारे मोबाईलवर बोलत असतात. मंदिर पाहिल्याबरोबर सवयीने जाता-जाता परमेश्वराला उडता नमस्कारही करतात. यात वाहानावर स्वार झालेलेही भक्त येतात व कार चालकही येतात. माझा एक ड्रायव्हर तर मंदिर, मशीद, चर्च, कबर, समाधी अस रस्त्यात दिसलं की भक्तीभावाने नमस्कार करतो. त्याचा हा सर्वधर्मसमभाव मला आवडतो. देवळात आपण खरोखर का जातो व भक्तीभावाने देवाला नमस्कार का करतो याची खूप निरनिराळी स्पष्टीकरणे मिळू शकतात. पण, 'सर्वे सुखिन: सन्तु' हा हेतू असेल तर तो भाव देवाच्याद्वारी सहज रुजू होत असेल हे नक्की.

◆◆

# निरोप गणरायाला...

गणेशाची मूर्ती घेण्यासाठी मी ज्या स्टॉलमध्ये गेलो होतो तेथे एक पाच-सहा वर्षांचा मुलगा रुसून बसला होता. त्याच्या वडिलांनी आधीच जी एक मूर्ती 'बुक' केली होती. ती त्याला पसंत नव्हती. त्याची समजूत घालण्याचा सर्वजण प्रयत्न करीत होते. पण, तो पठ्ठ्या काही ऐकायला तयार नव्हता. शेवटी त्याच्या मनासारखी मूर्ती जेव्हा त्याच्या वडिलांनी घेतली, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर असे भाव होते की बस देखते रहो.

चित्रकारांच्या व शिल्पकारांच्या कल्पनेला गणेशाने सदैव खाद्य पुरविले आहे. गणेशाला कुठलाही आकार दया. तो सुंदरच दिसतो. त्याचं मनोहारी रूप डोळ्यात व मनात कितीही साठवलं तरी कमीच पडतं. गणेशमूर्तीचे डोळे हा त्या मूर्तीचा प्राण असतो. पहाताक्षणीच प्रेमात पडावं अशा गणरायाच्या असंख्य मूर्ती असतात. पण, तरीही त्याच्या वस्त्राचा रंग, त्याची बैठक त्याच्या चेहऱ्यावरचे भाव या सगळ्यांचं लोक बारकाईने निरीक्षण करतात व मगच मूर्ती घेतात.

स्मार्ट फोन व टि.व्ही.च्या आजच्या काळात कुटुंबातील सर्वलोक एकत्र येऊन गप्पा तर सोडाच पण, निदान एकमेकाशी प्रत्यक्ष (व्हर्च्युअल नव्हे) संवाद करताहेत. एकत्र येऊन हास्यविनोद करीत जेवताहेत हे चित्र दुर्मिळ

झालेलं आहे. पण, गणपती बाप्पामुळे काही काळ का होईना, विघ्नहर्त्याच्या सहवासात काळजी, विवंचना, रोजच्या जीवनातील दगदग व असुरक्षितता, महागाई याचा विसर पडतो.

एरव्ही तो 'सर्व कार्येषु सर्वदा' असतोच. पण, भाद्रपद शुद्ध चतुर्दशी ते अनंत चतुर्दशी हा गणाधीशाच्या प्रत्यक्ष सहवासाचा, त्याच्या संन्निध राहण्याचा मंगलमय काळ. या काळात निसर्गाची साथ असेल तर तो सुखकर्ता असतो. नसेल तर दुखहर्ता म्हणून त्याची प्रार्थना करता येते. बुद्धी, कला, ज्ञान, विज्ञान व कोटी सूर्याचं तेज असलेल्या सर्वांच सगुण, साकार रूप म्हणजे गणराय. खऱ्या अर्थानं त्याची पूजा करून या शाश्वत गुणांचा व गोष्टींचा आपण सन्मान करतो.

सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात महाराष्ट्रात झाली. कालानुरूप त्याच्या स्वरूपात व हेतूत बदल हा स्वाभाविक आहे. बसल्या जागी व हाताच्या बोटावर करमणूकीची व माहितीची साधनं आता उपलब्ध झाली आहे. सोशल नेटवर्किंगची साधनं आणि तंत्रज्ञानातील प्रगती यामुळे सार्वजनिक गणेशोत्सवातील उत्साह भविष्यकाळात कसा राहील हे सांगता येत नाही. परंतु, टि.व्ही. व इलेक्ट्रॉनिक मिडिया ज्या काळात नव्हता त्याकाळात मनोरंजनाचं प्रबोधनाचं व कला संवर्धनाचं फार मोठ काम सार्वजनिक गणेश मंडळाकडून झालं आहे हे मात्र नक्की.

परंतु, घरातील गणपती व त्याबरोबरच येणाऱ्या गौरीमुळे घरात जी प्रसन्नतेची बरसात होते ती असीम व अक्षय्य आहे व राहील. घरातील विघ्नहर्त्याचं विसर्जनही आपण दणक्यात करीत असलो तरी घरातील गणपती व गौरीच्या रिकाम्या जागेकडे पाहून खिन्नता दाटून येतेच. आनंदाने न्हावून निघणारे ते दिवस भर्रकन निघून जातात. आनंद किंवा दु:ख ही अवस्था कायमची नाही हा संदेश सुखकर्ता, दुखहर्ता आमच्यात येवून, आमच्यात राहून आम्हाला देत असतो. तो वाजत–गाजत येतो व वाजत–गाजत जातो. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' म्हणत आम्ही त्याला निरोप देतो आणि त्याच्या प्रेमळ व स्निग्ध डोळ्यातून ते प्रॉमिस आम्हाला कधीच मिळालेलं असतं.

◆◆

# बैल गाडी ते बीएमडब्ल्यू...

१९८०च्या आधी म्हणजे साठ व सत्तरच्या दशकात खाजगी वाहनांची संख्या नगण्य होती. दोन–तीनच कार कंपन्या कारचं उत्पादन करायच्या. प्रिमियर कंपनीची फियाट व हिंदुस्थान मोटर्सची ॲम्बॅसडर. शेवरलेट टॅक्सी ही प्रवासी वाहतूकीसाठी वापरली जायची आणि या काळ्या पिवळ्या टॅक्सीज एवढ्या खच्चून भरल्या जायच्या की आतल्या प्रवाशाचं मुटकुळं किंवा गाठोडं होत असे. शेवरलेटच्या मागच्या सीटवर पाय उकीडवे घेऊन बसत. त्यांच्यापुढे काही प्रवासी बसत. तर मधल्या जागेत काही ओणवे होऊन उभे राहत. पुढच्या सीटवर पाच–सहाजण बसत. ड्रायव्हर शेजारी असलेला प्रवासी गिअरला टांग मारून दोन्ही पाय फाकवून बसत असे. पाच प्रवासी बसायचे तिथे पंधरा–सोळा बसलेले असत. वाटेतील मधल्या प्रवाशांनाही बसविण्याची ड्रायव्हरची इच्छा असे. मग आतले प्रवासी खेकसत. ड्रायव्हर स्वत:ही ड्रायव्हरला जेवढी जागा लागते त्यापेक्षा एकचतुर्थांश जागेत दाटीवाटीने बसून गाडी  दामटत.

सत्तरच्या दशकात राजदूत, जावा व बुलेट या दुचाकी बाईक्स होत्या. याचं तंत्रज्ञानही जुनाट होत. ऐंशीच्या दशकात होंडाची एन्ट्री झाली. १९८४ नंतरच हळू–हळू उदारीकरण होत असल्याने इतरही अनेक कंपन्यांमुळे भारताची

वाहन बाजारपेठ गजबजू लागली. पूर्वी स्कूटर किंवा मोटारसायकल खरेदी करणं हेही दिव्यच होतं. आधी पाचशे वा हजार रुपये डिपॉझिट भरावे लागत. नंतर ती कंपनी ग्राहकाला कळवित असे की तुमचा क्रमांक अमूक–अमूक इतका असून दोन वर्षांनी तुम्हाला स्कुटर / मोटारसायकल मिळेल. दोन–तीन वर्षांनी स्कुटर मिळाली की स्कुटर मालकाची कॉलर ताठ होत असे. अनेकांना त्याचं खूप कौतुक असे.

ऐंशीच्याच दशकात मारुती कार देशात तयार व्हायला लागली व जुन्या कारचा जमाना संपुष्टात आला. पूर्वी भारतीय कार उद्योगाची स्थिती चि.वि. जोशींच्या चिमणरावाच्या 'त्या' कारसारखी होती. हॉर्न सोडून त्या कारचं सगळं काही वाजत असे.

कर्ज सुविधा वाढल्या. वाहन उद्योग वाढला. क्रयशक्तीतही वाढ झाली आणि आज जगातल्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या कंपन्यांची वाहनं रस्त्यावर धावत आहे. ऑटोमोबाईल उद्योग हा भारताच्या महत्त्वाच्या उद्योगापैकी एक आहे. मोटारसायकलवर अख्खं कुटुंब प्रवास करतांना बघून टाटांनी नॅनो तयार केली व नव मध्यमवर्गाची ती हौस ही पूर्ण केली.

वाहनांची संख्या वाढत आहे. पण, रस्त्यांचे काय? त्याहीपेक्षा त्याला लागणाऱ्या इंधनाचे काय? वाहनं ही आजच्या आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे पेट्रोल व डिझेलच्या भाववाढीनं सामान्य माणसाचं बजेट कोलमडतं. पर्यावरणाची आपण कधीच ऐशी का तैशी केली आहे; पण सार्वजनिक वाहतूक व्यवस्था तर किमान आपण बळकट करू शकतो. बैलगाडी ते बी.एम.डब्ल्यू व बुलेट ट्रेन पर्यंतचा प्रवासाचा टप्पा भारताने ओलांडला आहे.

◆◆

# तमसोमा ज्योतिर्गमय...

बेळगावातील एक नामवंत वकील सदाशिव बाळकृष्ण भाटे यांच्याकडे १५ आक्टोबर १८९२ रोजी भल्या सकाळी एक अत्यंत तेजस्वी असा साधु पुरुष आला. त्याने कोल्हापूरच्या महाराजाचे खाजगी सचीव रावसाहेब लक्ष्मणराव गोळवळकर यांचे पत्र भाटे वकील यांना दिले. हा कुणी साधारण साधु नव्हता. संस्कृत, इंग्रजी, हिन्दी व बंगाली या भाषांवर त्याचं प्रभुत्त्व होतं. तत्त्वज्ञानात त्याने त्याकाळी पदवी मिळविलेली होती. भाटे यांचे मित्र हरिपाद मित्रा यांच्या घरी तो सन्यासी नऊ दिवस वास्तव्यास होता. त्या सन्यस्त पुरुषाचं नाव होतं स्वामी विवेकानंद. बेळगावच्या किल्ला परिसरात असणारं हे घर रामकृष्ण मिशनने सुरेखपणे जपले आहे. विवेकानंद ही तेजाची शलाका होती. त्यांच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या या वास्तूत प्रवेश करणं हा खरच एक विलक्षण अनुभव आहे.

बेळगाव हे एक निवान्त व निसर्गसुंदर शहर आहे. कर्नाटक सरकारने त्याचं आता 'बेळगावी' अस रूपांतर केलं आहे. संयुक्त महाराष्ट्राची संकल्पना वस्तुत: कारवार, निपाणी, बेळगाव, चिकोडी व अर्थातच मुंबईसह महाराष्ट्र अशी होती. हा सगळा कृषीदृष्ट्या संपन्न भाग महाराष्ट्राशी भाषिक व ऐतिहासिकदृष्ट्याही जोडलेला होता. मी बेळगावला गेलो तेव्हा दसरा होता.

तिथे मराठी भाषक समुदाय दसरा केव्हढ्या जल्लोषात व पारंपारिक पद्धती जपत, साजरा करतो.

बेळगाव हे दूध, खवा व तूप यासाठी प्रसिद्ध आहे. बेळगावचा खव्याचा कुंदा व पेढे ही खव्वयेगिरीसाठी खास चीज आहे. जीभेवर विरघळणारी इडली व वडा आणि फक्त कर्नाटकात मिळतं असं सांबार हे बेळगावचंही वैशिष्ट्य आहेच. शैक्षणिकदृष्ट्या बेळगाव पुढारलेलं आहे. शंभर वर्षापूर्वी स्थापन झालेल्या शिक्षण संस्था इथ आहेत.

बेळगावात आर्मी कॅम्प आहे. आर्मीच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रात 'मिलीटरी दुर्गा' 'मिलीटरी गणपती' व 'मिलीटरी महादेव' यांची मंदीरे आहेत. आर्मीच्या ताब्यात असल्याने येथील मंदिराची देखभाल, वाहतूक व्यवस्था व स्वच्छता अतिशय उत्कृष्ट आहे. देवादिकांच्यापुढे मिलीटरी हा शब्द वाचून करमणूक होते. पण, बेळगावकरांनीच त्यांच्या स्थानिक भाषेत देवांना ही नावे दिल्याने मंदिराचे लोकेशन पटकन लक्षात येते.

बेळगावच्या किल्ला परिसरात असलेली कमलबस्ती जैन मंदिर हा भारतीय शिल्पकलेचा अजोड नमुना आहे. अकराव्या शतकात बांधलेल्या या दगडी मंदिराची वास्तुकला अचंबित करणारी आहे.

स्वामी विवेकानंदांनी म्हटलेलं आहे, 'मी विदेशात जाण्यापूर्वी भारत मला प्रिय होताच. परंतु, विदेशातून परतल्यानंतर मला आता तो परम पवित्र वाटतो. हे माझे तीर्थक्षेत्र आहे.' तिमिरातून तेजाकडे नेणाऱ्या त्या प्रज्ञावंत सन्यस्ताचे हे शब्दही तीर्थरूपच आहेत.

◆◆

# चाँद जब चमके...

'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार, मनुजा चातुर्य येत असे फार,' असे म्हटले जाते. प्रवास न आवडणारी व्यक्ती दुर्मीळच. चालणाऱ्याचे भाग्य चालते; मात्र यासाठी डोळे, कान व मन उघडे पाहिजे.

परदेश जाऊ द्या; परंतु आपला देशच विविधता, नावीन्य व चमत्कृतीजन्य गोष्टींच्या पोतडीने भरगच्च भरलेला देश आहे. प्रत्येक राज्य भाषा, भूषा, संस्कृती व प्राकृतिक सौंदर्य याबाबत निरनिराळा आहे. खाद्य विशेष तर भारतात जेवढे आढळतात तेवढे जगात क्वचितच असतील. माझ्या गावी ब्रिटिशांनी स्थापन केलेले एक हायस्कूल आहे. त्यांचे मुख्याध्यापकही ब्रिटिश असत. असेच एक ब्रिटिश प्रिन्सिपॉल गावातील हलवायाच्या दुकानातून गुडीशेव व जिलबी घेऊन मजेत खात हिंडत; पण अगदी काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत व्हेज आणि नॉनव्हेज खाण्याचे असंख्य प्रकार आहेत. मिठाईंचेही अगणित प्रकार; पण हा झाला जिव्हा व पोट तृप्त करणारा भाग; पण दृष्टी व मन शांत करणारी कितीतरी ठिकाणे देशात आहेत. गेल्या काही वर्षांपासून विशेषत: संगणक क्रांतीनंतर प्रवासातील कित्येक अडथळे सहज दूर झाले आहेत. रेल्वे किंवा विमानाचे रिझर्व्हेशन असो की हॉटेलचे बुकिंग. एका क्लिकवर या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. पूर्वी (म्हणजे पंचवीसएक

वर्षांपूर्वी) प्रवास म्हणजे संकट वाटे. गर्दी, गैरसोयी व असुरक्षितता. यामुळे प्रवासाने शहाणपणात कितीही भर पडत असली, तरी प्रवासातील दगदगीमुळे प्रवास न करण्यातच जास्त शहाणपण आहे, असे वाटत असे.

पूर्वी प्रामुख्याने धार्मिक कारणासाठी प्रवास करीत. आताही तसा तो करतातच. कुंभमेळा हे याचं एक ढळढळीत उदाहरण. प्रवासाची साधने व सोयी जशा वाढल्या तशी प्रवास करणाऱ्यांची संख्याही वाढली. नैसर्गिक सौंदर्य, समृध्द कला, इतिहास व सांस्कृतिक परंपरा, खाद्य संस्कृतीतील वैविध्य व प्रत्येक राज्याचे माणसांमधील देखील वेगळेपण यामुळे देशांतर्गत भारतीयांचे प्रवास व पर्यटन आकर्षण वाढले आहे. 'मला माझ्या सांस्कृतिक परंपरेचा अभिमान आहे,' हे केवळ शालेय प्रतिज्ञा रहाता कामा नये. प्राचीन शिलालेखावर स्वत:ची नावे कोरणे, प्लास्टिकचा कचरा उघड्यावर फेकून देणे हे केवळ असभ्य व असंस्कृतच नव्हे, तर अतिशय दंडनीय व अश्लाघ्य वर्तन आहे. सिमल्याचा माल रोड हे तेथील भूषण आहे. तो रस्ता जाणीवपूर्वक लोक स्वच्छ ठेवतात, हे बघितल्यावर फार बरे वाटले. सर्व ऋतूंची एकाच वेळी रेलचेल व निसर्गाची उधळण या देशावर आहे. निसर्गाने आपल्याला भरभरून दान दिले आहे. ते सांभाळण्याची व जपण्याची क्षमता भारतीय माणसाने निर्माण करायला हवी. युरोपात असताना एका युरोपियन व्यक्तीने भारत त्याला खूप आवडतो, असे सांगितल्यावर मी त्याला विचारले, 'तुला भारतातील कोणती गोष्ट आवडते?' त्याने सांगितले तुम्ही सर्व भारतीय एकमेकांपासून खूप निराळे दिसता, हे मला आवडते. अति परिचयाने काही गोष्टी आपल्या लक्षातच येत नाही. जपान, चीन व युरोपीय देशातील लोकांच्या चेहरेपट्टीत साध्यर्म असते. म्हणजे चीनमधील लोकांचे बारीक डोळे, चपटे नाक, पिवळसर रंग इत्यादी पण भारतातील प्रत्येक व्यक्ती निराळी.

प्रवासात आजूबाजूचा प्रदेश, माणसे, घरे पहाण्याऐवजी बसमध्ये व्हिडीओ बघणाऱ्यांना नमस्कार करावे तेवढे थोडे आहे. पर्यटनातील आनंद निरीक्षण व पर्यटन स्थळाचे फिल घेण्यात आहे. हे पर्यटन कल्चर निर्माण झाले तरच 'केल्याने देशाटन मनुजा चातुर्य येत असे फार,' असे म्हणता येईल. निदा फाजली यांच्या कवितेच्या ओळी उद्‌घृत कराव्याशा वाटतात.

धूप में निकलो
घटाओ में नहाकर देखो
जिन्दगी क्या है
किताबोको हटाकर देखो
सिर्फ आँखोसेही दुनिया
नहीं देखी जाती
दिलकी धडकन को भी 'ज्योति'
बनाकर देखो
फासला नजरोका धोका भी
तो हो सकता है
चाँद जब चमके जरा हाथ
बढाकर तो देखो...

◆◆

# नवीन वर्ष व छोटीसी आशा

पुन्हा एकदा नवीन हर्ष, नवीन पहाट, नवीन सकाळ आणि नवी अशा घेऊन नवीन वर्ष अवतरत आहे. तसं ते दरवर्षीच अवतरतं. काही क्षणांपर्यंत तरी जुनीच महागाई, जुनेच प्रदूषण, रस्त्यांची जुनीच वाताहत, वाहतुकीचा जुनाच बोजवारा आपण विसरू या. यात सुधारणा होईल या आशेवरच तर आपण जगत आहोत. या नवीन आशेची संधी नववर्ष आपल्याला देतं. हे काय कमी आहे?

आशेची अर्थातच अनेक रूपं आहेत. सामान्यत: माणसाच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्न, आनंद, सुख, पद, नाती, पैसा, प्रतिष्ठा, छंद, आवड इत्यादींभोवती माणसांचे विचार व कृती एकवटलेली असतात. विचार करणं सोपं; कृती करणं कठीण आणि विचारानुसार कृती करणं त्याहून कठीण. कारण, केवळ विचार करून फक्त आशा केल्यास 'आशाळतभूतपणा' शिवाय काही गवसणार नाही. विचाराप्रमाणे कृती करणाऱ्याची 'जीवन नैय्या' पार होणार हे सांगण्यास ज्योतिषाची गरज नाही. माणूस आशेवर जगतो असं म्हणतात, 'जबतक साँस तबतक आस' यात तथ्य आहेच.

नवीन वर्षाचं कॅलेंडर हे सुट्ट्या मोजण्याची दिनदर्शिका ही असते! विवाहाचे मुहुर्त, दिवाळीची सुट्टी, गणेश चतुर्थी व जोडून येणारी सुट्टी,

मुलांच्या परिक्षेची वेळापत्रकं व सुट्या, प्रवासाचे बेत, निकाल, निर्णय हे सर्व नवीन वर्षाच्या पोटात दडलेलं असतं. आशा व निराशाचेही अज्ञात झुले या काळाच्या पदरालाच बांधलेले असतात.

नवीन वर्षात व्यक्तिगत स्तरावर माणसं काही सुनिश्चय करतात. उदा. मी नवीन वर्षात वजन कमी करेन, किमान पाच चांगली पुस्तके वाचेन, इतरांना मदत करेन, बचत करेन, छोट्या टूरवर जाईन, सिगारेट पिणे सोडेन, कुटुंबाला अधिक वेळ देईन, नवीन काही शिकेन, पहाटे फिरायला जाईन इ. इ. हे सगळं मी उदयापासून करेन. पण, या बाबतीत एक गोष्ट निश्चित आहे की हे उदयाच वगैरे काही खरं नाही. आजचा दिवस खरा. कारण, इंग्रजीत एक म्हण आहे, 'टूमारो नेव्हर कम्स'. उदयाच्या भरवसा नाही. म्हणूनच 'कल करे सो आज कर, आज करे सो अब, इतनी जल्दी इसलिए जब दिन नही है बरसो' असं म्हणतात.

पण हे ज्यांना मान्य नाही ते म्हणतात, 'आज करे सो कल कर, कल करे सो परसो, इतनी जल्दी क्या है जब दिन पडे है बरसो.'

माझ्या कॉलेजमधील विद्यार्थी मित्रांना मी 'नवीन वर्षाच्या आशा' या वर असच काही सांगत होतो. त्या ग्रुपमधला माझा एक विद्यार्थी म्हणाला, 'सर, मी पण आशावादी आहे.' त्याच्या या वाक्यावर जबरदस्त हास्यस्फोट झाला. का झाला ते मला कळेना. माझा प्रश्नांकित चेहरा पाहून तो मिस्किलपणे म्हणाला, 'सर, माझं आशा नावाच्या मुलीवर प्रेम आहे. म्हणून मी आशावादी आहे'. मी म्हणालो, 'अस्स होय, तुझं तिच्यावर प्रेम आहे पण तिचं तुझ्यावर आहे काय? पण, नसल्यास तुला 'आशा' करायला हरकत नाही. लगे रहो मुन्नाभाई!'

भूतकाळातील पाने लिहून झालेली असतात. परंतु, भविष्यकाळातील पाने कोरी असतात. ती नव्याने लिहिण्याची आशा तर आपण निश्चित करु शकतो.

नवीन वर्षाचे नवे सुनिश्चय (न्यू इयर्स रिझॉल्यूशन्स) काही काळ खरे ठरतातही. पण, जस-जसे नवीन वर्ष जुने व्हायला लागते. तस-तसे जुन्या सवयी डोकं वर काढतात. नंतर डोक्यावर बसतात. मग, पुन्हा नवीन वर्ष व नव्या आशा... पण, नव्या वर्षाचं स्वागत करतांना येत्या वर्षात भ्रष्टाचार

व महागाई कमी होवो अशी आशा करायला हरकत आहे? ते कमी करण्याची जबाबदारी तर निदान दुसऱ्यावर ढकलता येते!

◆◆